दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २०२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.०९ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार; नाशिक, जळगावसह मराठवाड्यातील ७ जिल्ह्यांना यलो अलर्ट

मुंबई/पुणे दि.८ (प्रतिनिधी)- राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने तापमानात आणि उकाड्यात वाढ झाली होती. मात्र, आता पुन्हा एकदा हवामानात मोठा बदल होत असून, राज्याच्या अनेक भागांत पावसाचा जोर वाढण्याची चिन्हे आहेत. भारतीय हवामान विभागाने आज (८ ऑगस्ट) नाशिक आणि जळगावसह मराठवाड्यातील ७ जिल्ह्यांना विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा देत यलो अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, आज राज्यात प्रामुख्याने नाशिक, जळगाव, जालना, परभणी, हिंगोली, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाचा तडाखा बसू शकतो. या भागांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार वारे वाहण्याची आणि मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे या जिल्ह्यांतील नागरिकांनी घराबाहेर पडताना योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यलो अलर्ट असलेल्या जिल्ह्यांव्यतिरिक्त कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित भागांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळू शकतात. सध्या अल निनोचा वाढता प्रभाव आणि पावसाची ओढ यामुळे नागरिक प्रचंड उकाड्याने त्रस्त आहेत. मात्र, स्थानिक पातळीवर हवामानात होणाऱ्या या अचानक बदलांमुळे काही भागांत नागरिकांना उकाड्यापासून थोडासा दिलासा मिळू शकतो.

# आमचा तुमच्यावर विश्वास, देशाला तुमची गरज

## सीजेपीच्या आंदोलनानंतर पंतप्रधान मोदींचे विद्यार्थ्यांना आवाहन

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटीविरोधात कॉक्रोच जनता पार्टीने जंतरमंतर येथे तीव्र आंदोलन केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधातील रोष वाढला होता. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पहिल्यांदा जाहीर भाषण केलं. यावेळी त्यांनी तरुण पिढीच्या क्षमता आणि सामर्थ्यावर विश्वास व्यक्त केला. नवी दिल्लीतील नामांकित भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या वार्षिक पदवीदान समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत होते.



"आमचा तुमच्यावर विश्वास आहे. देशाला तुमची गरज आहे", असं पंतप्रधान मोदी म्हणाले. प्रत्येक पिढीची राष्ट्रीय जबाबदारी असते, असं सांगून तरुणांच्या उद्दिष्टांमध्ये देशाचा सर्वांगीण विकास समाविष्ट असला पाहिजे, असं त्यांनी सुचवलं. "तुम्हा सर्वांना माहीत आहे की प्रत्येक पिढीला त्यांच्या काळातील विशिष्ट आव्हानांना सामोरं जावं लागतं आणि त्यांची स्वतःची राष्ट्रीय जबाबदारीही असते. तुमच्या आयुष्यातील पुढील ३० ते ३५ वर्षांत तुम्ही जे काही कराल, त्याचा परिणाम आमच्या 'विकसित भारत'च्या प्रवासावर होईल. त्यामुळे, तुम्ही घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा आधार हाच असावा, याचा देशाला कसा फायदा होईल? याद्वारे देशाची कोणती गरज पूर्ण होईल?" असं ते म्हणाले.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं पंतप्रधान मोदींनी सांगितलं. जे या बदलांशी जुळवून घेतील तेच अखेर जिंकतील, असं त्यांनी सुचवलं. "जागतिक धोरणात्मक समीकरणे वेगाने बदलत आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या वेगामुळे जागतिक सत्तेचा समतोल प्रत्येक क्षणाला बदलत आहे. पुढील २० किंवा ३० वर्षांत जग कसं दिसेल हे कोणीही खात्रीने सांगू शकत नाही. जग, तंत्रज्ञान, उद्योग आणि व्यवसाय सर्वच बदलतील. पण या सगळ्यात एक गोष्ट लक्षात ठेवा, जे शिकत राहतील तेच यशस्वी होतील", असं ते म्हणाले.

स्कायरूटच्या 'विक्रम-१' रॉकेटच्या यशस्वी प्रक्षेपणाचा उल्लेख करत पंतप्रधानांनी अधोरेखित केलं की, सरकारने तरुणांना त्यांचं योगदान देण्यासाठी विविध मार्ग खुले केले आहेत. "आम्ही अनेक मार्ग खुले केले आहेत ज्याद्वारे आमचे तरुण योगदान देऊ शकतात. नवीन क्षेत्रे खुली करण्यात आली आहेत. मी यापूर्वी अंतराळ क्षेत्राबद्दल बोललो होतो. आज तेच अंतराळ क्षेत्र आमच्या तरुणांसाठी आकाश बनले आहे", असं ते म्हणाले. आपल्या भाषणाला 'जेन झी' चा स्पर्श देत पंतप्रधान मोदी म्हणाले, "आज आमचा तरुण म्हणत आहे, 'माझ्या घराण्यात रॉकेट बनवणारा मी पहिलाच'. आज आमचा तरुण रॉकेट लॉन्च करत आहे. आमचे ड्रोन क्षेत्रही विस्तारत आहे. राष्ट्रीय सुरक्षेत आणि औषधांच्या वाहतुकीसाठी ड्रोनचा वापर केला जात आहे", असंही त्यांनी स्पष्ट केलं.

## झारखंड सरकारसोबत विद्यार्थ्यांची चर्चा निष्फळ

### पीएससी रद्द करण्याच्या मागणीसाठी ६ विद्यार्थ्यांचे उपोषण

रांची दि.८ (वृत्तसंस्था)- झारखंड पीएससी-एसएससी परीक्षांमधील अनियमिततेसंदर्भात आंदोलनकर्ते विद्यार्थी आणि सरकारी शिष्टमंडळ यांच्यात झालेली चर्चेची दुसरी फेरी अनिर्णित राहिली. ही बैठक एक तास चालली. यापूर्वी, शुक्रवारी रात्री सरकारी शिष्टमंडळाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला होता, परंतु या बैठकीतूनही काही निष्पन्न झाले नाही. दरम्यान, सरकारने विद्यार्थ्यांना त्यांच्या सूचना सादर करण्यासाठी एक ईमेल आयडी आणि एक फीडबॅक नंबर जारी केला आहे. मंत्री सुदिव्य कुमार सोनू म्हणाले, "आम्ही विविध विद्यार्थी गट आणि हितधारकांना भेटू. सर्व सूचनांचा विचार करून निर्णय घेतला जाईल."

झारखंड पीएससी रद्द करण्याच्या मागणीसाठी सहा विद्यार्थी उपोषणावर आहेत. विद्यार्थ्यांनी १० ऑगस्ट रोजी विधानसभेला घेराव घालण्याची घोषणा केली आहे. आज सकाळी, एबीव्हीपीचे कार्यकर्ते मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाला घेराव घालण्यासाठी निघाले होते, परंतु पोलिसांनी त्यांना रोखले.

शुक्रवारी राज्य सरकारच्या शिष्टमंडळ आणि विद्यार्थी नेत्यांमध्ये चर्चा झाली. यानंतर विद्यार्थी नेते रवींद्र पासवान म्हणाले, "ही आमची पहिलीच बैठक होती, जी खूप सकारात्मक होती." आम्हाला विश्वास आहे की सरकार, मुख्यमंत्री आणि सर्व मंत्री आमच्या मागण्या मान्य करतील. आमच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहील. दरम्यान, मंत्री सुदिव्य कुमार सोनू म्हणाले, "आम्ही सौहार्दपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांना भेटलो. आम्ही त्यांच्या मागण्या समजून घेतल्या. सरकार त्यांच्या मागण्यांवर गांभीर्याने विचार करण्यास कटिबद्ध आहे." या बैठकीत सरकारच्या वतीने मंत्री चमरा लिंडा, सुदिव्य सोनू, दीपिका पांडे सिंग आणि संजय यादव उपस्थित होते. विद्यार्थी शिष्टमंडळात रवींद्र पासवान, पियुष कुमार, राजेश प्रसाद, नीतू कुजूर, अंकित राज, कार्तिक सोरेन, शालू कुमारी, रवींद्र कुमार रवी, आनंद कुमार आणि अंकित कुमार यांचा समावेश होता.

विद्यार्थी नेते देवेंद्र नाथ महातो म्हणाले, "मला बोलताना खूप त्रास होत आहे. डॉक्टरांनी सांगितले की माझी रक्तातील साखर आणि रक्तदाब कमी झाला आहे. माझ्या शरीरातील पाणी खूप कमी झाले आहे. माझे शरीर आता हे सहन करू शकत नाही." सरकारी अधिकाऱ्यांसोबत झालेल्या विद्यार्थ्यांच्या बैठकीबद्दल ते म्हणाले, "मी उपस्थित नव्हतो, पण विद्यार्थी उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या मागण्यांची यादी सादर केली. सरकारने त्यांच्या मागण्या रास्त असल्याचे आश्वासन दिले आहे आणि या प्रकरणावर विचार करत असल्याचे सांगितले आहे."

## बीडमध्ये तब्बल १ कोटी ९४ लाखांचा खाद्यतेलाचा साठा जप्त, ५ युनिट्स सील

बीड दि.८ (प्रतिनिधी)- आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात धडक कारवाई सुरु केली आहे. आता बीड जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाने बनावट आणि बेकायदा खाद्यतेल रिपॅकिंग करणाऱ्या माफियांविरोधात एक मोठी कारवाई केली आहे. बीड शहर, माजलगाव आणि वडवणी परिसरातील पाच वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून प्रशासनाने तब्बल १ कोटी ९४ लाख ५० हजार ९२२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या धडक कारवाईने जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, या कारवाईदरम्यान १ लाख १९ हजार १८६ किलो बनावट व बेकायदा साठवणूक केलेले खाद्यतेल जप्त करण्यात आले आहे. रिफाइंड आणि अल्ट्रा रिफाइंड अशी केवळ वरवरची आकर्षक नावे देऊन आणि आकर्षक पॅकिंग बदलून एकाच हलक्या प्रतीचे तेल सर्वसामान्यांच्या माथी मारले जात होते. नागरिकांच्या थेट जिवाशी खेळणारा हा धक्कादायक प्रकार अन्न व औषध प्रशासनाच्या सतर्कतेमुळे उघडकीस आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाने प्रशासनाने बीड शहरातील दोन ऑइल रिपॅकिंग युनिट, वडवणीतील एक आस्थापन आणि माजलगावमधील सुट्टे खाद्यतेल साठवणाऱ्या दोन ठिकाणी ही कारवाई केली. यात स्वागत ऑइल इंडस्ट्रीज (बीड), चरखा ऑइल मिल (बीड), जय हनुमान ट्रेडर्स (वडवणी), जानवी कमर्शियल (माजलगाव), विनायक ऑइल मिल (माजलगाव) या पाच आस्थापनांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

## महाराष्ट्राच्या प्रश्नावर आम्ही भेटणार आहोत; पंतप्रधान मोदींबरोबरच्या भेटीबाबत सुप्रिया सुळेंचा खुलासा

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केलेल्या ठाकरे गटाच्या खासदारांसह तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर खासदारांनी नुकतीच पंतप्रधान मोदींची भेट घेतली. पंतप्रधान मोदी यांनी या खासदारांना अल्पोपहाराचे निमंत्रण दिले होते. यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे खासदारही पंतप्रधान मोदींची भेट घेणार आहेत. यावरुन विविध चर्चा उपस्थित होत असतानाच खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन या भेटीमागचे कारण सांगितले आहे. तसेच आम्हाला नाश्त्यासाठी बोलावलेले नाही, असाही खुलासा त्यांनी केला.

मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, "कालच संसदेत आम्ही खासदारांशी चर्चा करत होतो. तेव्हा महाराष्ट्रातील काही गंभीर प्रश्नासंदर्भात खासदारांनी चिंता व्यक्त केली. दुर्दैवाने काही दिवसांपासून सभागृह चालत नाहीये. त्यामुळे राज्यातील पाणी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या असे काही प्रश्न आहेत. सर्व खासदारांना वर्षाला पाच कोटी रुपयांचा निधी मिळतो, मात्र त्याची अंमलबजावणी करण्यात अडथळे निर्माण होतात. राज्य सरकारकडून अपेक्षित अशी मदत खासदारांना मिळत नाही. हे प्रश्न घेऊन पंतप्रधानांकडे जाण्याचा सूर खासदारांच्या बोलण्यातून समोर आला."



"खासदारांशी झालेल्या चर्चेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) आठ खासदारांनी पंतप्रधान मोदींची अधिकृतरित्या वेळ मागितली. आमच्या आठ खासदारांना पंतप्रधान मोदींनी सोमवारी सकाळी ११ वाजता भेटीची वेळ दिली आहे. महाराष्ट्राच्या प्रश्नावर आम्ही भेटणार आहोत", असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

एकनाथ शिंदेंच्या सेनेचेही खासदार पंतप्रधान मोदींना भेटले होते, असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यानंतर सुप्रिया सुळे म्हणाल्या की, त्यांच्या खासदारांना नाश्त्यासाठी बोलावले होते. आम्हाला नाश्त्याला बोलावलेले नाही. आम्ही महत्त्वाच्या प्रश्नासाठी देशाच्या पंतप्रधानांची भेट घेत आहोत.

पंतप्रधान सर्वच पक्षाच्या खासदारांना भेटत असतात. आम्ही सरकारमधील मंत्र्यांनाही वेळोवेळी भेटत असतो. त्याप्रमाणेच आम्ही पंतप्रधान मोदींना दिवसाढवळ्या सकाळी ११ वाजता भेटणार आहोत. त्याचा फोटोही सार्वजनिक करू, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

संसदेत येत्या काही दिवसांत मतदारसंघ पुनर्रचना आणि परदेशी योगदान (नियमन) विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. यावरही सुप्रिया सुळे यांनी पक्षाची भूमिका मांडली. एफसीआरए विधेयकाला आताच्या मसुद्यानुसार आम्ही विरोध करत आहोत. केंद्र सरकारला आमची विनंती आहे की, घाई करू नका. हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले तर आम्ही विधेयकावर चर्चा करायला तयार आहोत. एफसीआरए विधेयक एकतर मागे घ्यावे किंवा संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावे, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली.

२० जुलै रोजी जंतर-मंतरवर काय झाले, याची एसआयटी स्थापन करून चौकशी करा, अशीही मागणी सुप्रिया सुळे यांनी केली. एसआयटी स्थापन करून त्यादिवशी काय झाले? याची माहिती दिली जावी. त्यादिवशी आम्ही लोकसभा सभागृहात बसलो होतो. तेव्हा आम्हाला अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्याचा आवाज आला. संसदेचे दरवाजे बंद करण्यात आले होते. हे कसे झाले, याची पारदर्शक चौकशी करावी, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली.

## मला अटक करण्याचा सरकारचा डाव, मनोज जरांगे यांचा गंभीर आरोप

जालना दि.८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचं पाहायला मिळत आहेत. काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा तापण्याची चिन्ह आहेत. यातच मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुती सरकारवर गंभीर आरोप केले आहेत.

जात वैधता प्रमाणपत्र रद्द केले जात असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. याच मुद्यांवर बोलताना आज (८ ऑगस्ट) मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर गंभीर आरोप केला आहे. 'मला अटक करण्याचा सरकारचा नवा डाव आहे', असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. तसेच मला फक्त अटक करून दाखवाच, असा इशाराही जरांगे यांनी सरकारला दिला आहे.

"मी काय चुकीचं बोलतोय? कुणबी प्रमाणपत्र रद्द करायला लावले जात आहेत, मग मी काय चुकीचं बोलतो? एका बोडखे नावाच्या व्यक्तीची जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी झाली आणि त्याच्याच बहिणीची जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी रद्द करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातून आमच्या मुळावर का उठले आहेत? आमच्या जात वैधता प्रमाणपत्र रद्द करा, अशा आशयाचं बावनकुळे यांचं हे पत्र आहे. मग मी काय चुकीचं बोलतोय? आमचे जात वैधता प्रमाणपत्र रद्द का केले जात आहेत? सरकारने माझी काय चूक हे देखील सांगावं. गेल्या एक वर्षांपासून आम्ही काहीही बोलत नव्हतो", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

## शाहसेनेच्या गद्दारांना भेटून मोदी सांगतात, भिऊ नका, मी तुमच्या पाठिशी; सुप्रीम कोर्टाला धमकावत आहात का?, उद्धव ठाकरेंचा मोदींना थेट सवाल

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- "चिंता करू नका, मी तुमच्या पाठीशी आहे." हा संदेश ते कोणाला देतायत? कोर्टाला धमकावणी देत आहात का? का अमित शाहांना देतायत? अशा शब्दात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हल्ला चढवला आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, मागे असं होतं की हे मिंधे जायचे तेव्हा ते त्यांच्या शाहसेनेच्या प्रमुखाला भेटायचे. आता शाहसेनेच्या प्रमुखाला भेटायची त्यांना गरज नाही, कारण त्यांचा आता बहुतेक बॉस बदललाय. आता ते थेट मोदींना भेटतात. आणि विशेष म्हणजे शाह इकडे असताना ते मोदींना भेटतायत. "भिऊ नको, मी तुझ्या पाठीशी आहे" ही धमकीवजा संदेश सुप्रीम कोर्टाला मोदींनी दिलाय का? की अमित शाहांना दिला आहे? की फडणवीसांना दिला आहे? की प्रशासनाला दिलेला आहे? नक्की कोणाला दिलेला आहे? अशी विचारणा उद्धव ठाकरे यांनी केली.

शिवसेना शिंदे गटाच्या खासदारांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पीएम मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीत मोदी यांनी भिऊ नको, मी तुमच्या पाठिशी असल्याचे सांगितले होते. सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्ष आणि चिन्हाची सुनावणी सुरु असताना शिंदे दिल्लीत पोहोचल्याने राजकीय भूवया उंचावल्या होत्या. या भेटीवर आता उद्धव ठाकरे यांनी संशय व्यक्त केला आहे.

आमच्या केसची सुनावणी सुरू असताना, जे पंतप्रधान ना नाही भेटले, ते पंतप्रधान गद्दारांना भेटतायत, गद्दारांना भेटतायत आणि गद्दारांना सांगतायत की भिऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे. हे फार आक्षेपार्ह आहे आणि याची दखल आम्ही तर घेतोच आहोत, जनतेने घेतली पाहिजे, पण सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा घेतली पाहिजे आणि विचारलं पाहिजे की, हे नेमकं तुम्ही कोणाला बोललेला आहात?"उद्धव ठाकरे यांनी सांगितले की, भिऊ नका हा संदेश इतर पक्षातील होऊ शकणाऱ्या गद्दारांना पण दिलाय का? की तुम्ही काळजी करू नका, गद्दारी करा, आमच्याकडे या, मी तुमच्या पाठीशी आहे. बघूया तुमचा आपका बाल भी नहीं बाका होगा, मैं देखता हूँ. तर असा हा संदेश किंवा ही धमकी मोदींनी कोणाला नक्की दिलीय? याचा खुलासा झाला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. त्यांनी सांगितले की, ही लढाई ही केवळ आता शिवसेनेपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर गद्दारीचा व्हायरस हा लोकशाहीचा जीव घेतोय. तर लोकशाहीबद्दल प्रेम असणारे, संविधानाबद्दल प्रेम असणारे जे देशभक्त आहेत, त्या तमाम कश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या तमाम देशभक्तांना मी आवाहन करतोय की, तुम्ही आता ही लढाई आपण सगळ्यांनी मिळून एकत्रित लढण्याची गरज आहे. देशाचं संविधान आणि देशाची लोकशाही वाचवण्याचं कर्तव्य हे आपल्याला करावं लागणार. देशातला तरुण तर त्याचं तर आता माथं भडकलंय. त्यांच्याबरोबर आता यांनी कितीही प्रयत्न केला तरी ते त्यांचं प्रवचन ऐकायला तयार नाहीत. म्हणूनच ही गोष्ट गंभीर आहे. ही आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्दर्शनास नक्की आणून देणार आहे. पण मोदींनी सांगायला पाहिजे की हा धमकीवजा संदेश तुम्ही नेमका कोणाला दिलाय? आणि गद्दारांना आता नेमकं भय कसलंय? वॉशिंगमध्ये धुऊन घेतल्यानंतर सुद्धा तुम्ही पुन्हा का घाबरून तुमची पळापळ का होतेय? का शेपट्या घालून तुम्ही मोदींकडे जाताय? अशा शब्दात ठाकरे यांनी हल्लाबोल केला.

## नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने मिळणार, आरबीआयचे धोरण बदलले

नागपूर दि.८ (प्रतिनिधी)- रिझर्व बँक ऑफ इंडियाने सहकारी बँकिंग क्षेत्रासंदर्भात एक मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. गेली २४ वर्ष नव्या नागरी सहकारी बँकांना रिझर्व बँकेकडून परवाने दिले जात नव्हते.मात्र,आता आरबीआयने नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्र, गुजरात सारख्या सहकारी चळवळ बळकट असलेल्या राज्यांमध्ये मोठ्या संख्येने नव्या नागरी सहकारी बँका उदयास येण्याची शक्यता वाढली आहे.

गेली काही दशक सहकारी बँकिंग क्षेत्रात होणारे घोटाळे आणि एकानंतर एक नागरी सहकारी बँकांवर आरबीआयकडून निर्बंध लावण्यात आले होते. नव्या नागरी सहकारी बँकांसाठी परवाने देताना अत्यंत काटेकोर निकष ही आरबीआय कडून लावण्यात आले आहेत.

## मनोज जरांगेंनंतर आता नरेंद्र पाटीलही आक्रमक; मराठा युवकांच्या जात प्रमाणपत्रावरुन अधिकाऱ्यांवर संताप

बीड दि.८ (प्रतिनिधी)- राज्यात उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर कुणबी मराठा समाजातील बांधवांना जात प्रमाणपत्र मिळाले, ओबीसीमधून हे जातीचे प्रमाणपत्र मिळाल्याने मराठा बांधवांनीही आनंद व्यक्त केलाय. मात्र, आता जात प्रमाणपत्र देताना किंवा जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दिले जात नसल्याने वाद उद्भवला आहे. तर, काहींची जात प्रमाणपत्रही रद्द करण्यात येत असल्याने मनोज जरांगे पाटील यांनी थेट सरकारला धारेवर धरलंय. त्यातच, आता आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनीही जात प्रमाणपत्र देताना काही अधिकारी खोडसाळपणा करतात, काही काही अधिकारी अति हुशार असतात, असे म्हणत प्रशासनाला लक्ष्य केलंय.

जात प्रमाणपत्र देताना काही अधिकारी जाणीवपूर्वक खोडसाळपणा करतात, असा गंभीर आरोप नरेंद्र पाटील यांनी केला आहे. महामंडळातील अधिकाऱ्यांकडून लावण्यात येणाऱ्या अटी-शर्तींवरून नरेंद्र पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे वारंवार तक्रारी करूनही कारवाई झाली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे मराठा समाजातील तरुणांना एकत्रित करून सरकारविरोधात आंदोलन उभारण्याचा इशाराही नरेंद्र पाटील यांनी दिला आहे. काही अधिकारी अति हुशार आहेत. जात प्रमाणपत्र देताना खोडसाळपणा करतात, असा थेट आरोप नरेंद्र पाटील यांनी केला आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडून लावण्यात येणाऱ्या अटी-शर्तींवरून नरेंद्र पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकारी मराठा समाजातील असूनही अशा अटी का लावल्या जात आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, २०२५ मध्ये प्रमाणपत्र घेऊन महामंडळाच्या माध्यमातून कर्ज घेतलेल्या अनेक तरुणांना कागदपत्रे अपलोड करता न आल्याने लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे मराठा समाजातील अनेक तरुणांचे फोन आल्याचा दावा देखील नरेंद्र पाटील यांनी केला. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी घेतलेल्या निर्णयांविरोधात आपण लेखी पत्र दिले असून, मंत्रिमंडळाच्या उपसमितीसह मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाही तक्रार केल्याचं पाटील यांनी सांगितले.

## फुटीर खासदारांना भेटणं हा गुन्हा; संजय राऊतांचा पंतप्रधान मोदींवर आरोप

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या गटातील खासदारांनी नुकतीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीतील निवासस्थानी भेट घेतली. या भेटीवरून आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान मोदी आणि भाजपवर टीका केली आहे. "पंतप्रधानांनी त्यांच्या निवासस्थानी गद्दारांसाठी कॅटरिंग सर्व्हिस सुरू केली आहे," असा टोला लगावतानाच, फुटीर खासदारांना पाठिंबा देऊन मोदी न्यायालयावर दबाव आणत असल्याचा गंभीर आरोप राऊत यांनी केला आहे.

"पंतप्रधान हे संपूर्ण देशाचे नसून केवळ भाजपमधील एका गटाचे पंतप्रधान आहेत. त्यांना संपूर्ण भाजपदेखील स्वीकारायला तयार नाही. मोदींनी दिल्लीतील निवासस्थानी आपली कॅटरिंग सर्व्हिस सुरू केली आहे. जे लोक पक्ष फोडून गेले आहेत, अशा गद्दारांना ते ब्रेकफास्ट आणि चहाला बोलावतात आणि आश्वासने देतात. एरवी ते कोणालाही भेटत नाहीत. मी गेल्या २५ वर्षांपासून खासदार आहे, पण आम्हा जुन्या आणि इतर खासदारांना ते का बोलावून घेत नाहीत?" शिंदे गटाच्या खासदारांना मोदींनी दिलेल्या पाठिंब्यावर आक्षेप घेत राऊत यांनी हा न्यायालयाचा अवमान असल्याचे म्हटले आहे. "गद्दारांचे प्रकरण सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. त्यांच्या गद्दारीवर सुनावणी सुरू असताना पंतप्रधान त्यांना सांगतात की, मी तुमच्या पाठीशी उभा आहे. मग तुम्ही पुढे काय करणार आहात? हा थेट न्यायालयावर दबाव आणण्याचा मोदींचा प्रयत्न आहे. फुटीर आणि पक्षांतर केलेल्या खासदारांना अशा प्रकारे भेटणे आणि त्यांना उघड समर्थन देणे हा एक गुन्हा आहे," असे राऊत म्हणाले.

## मद्य आणि पेयांमधील भेसळ खपवून घेणार नाही!; तुकाराम मुंढेंचा इशारा

पुणे दि.८ (प्रतिनिधी)- अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मद्य आणि मद्यार्क नसलेल्या पेयांमधील भेसळीबाबत गंभीर इशारा दिला आहे. पुण्यात गावठी दारूत विषारी रसायन मिसळल्याने मृत्यू झाल्याच्या घटना वाढल्या असून, भेसळीच्या तक्रारींमध्येही वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर, दूध, पनीर आणि खाद्यतेलांप्रमाणेच आता अल्कोहोलिक आणि नॉन-अल्कोहोलिक पेयांचीही तपासणी केली जाईल, असे मुंढे यांनी शनिवारी स्पष्ट केले. खानपानाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी बजावले.

खाद्यपदार्थांची गुणवत्ता आणि सुरक्षितता हा नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाचा विषय आहे. चरबीयुक्त, खारट आणि साखरयुक्त पदार्थांच्या अतिसेवनामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि लठ्ठपणासारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे. भेसळयुक्त अन्न, विषारी ताडी-दारू आणि निकृष्ट अन्नपदार्थ नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत. एफडीएने तक्रारींसाठी टोल-फ्री क्रमांक सुरू केला असून, त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. उच्च न्यायालयाच्या कॅन्टीनपासून ते शासकीय कार्यालयांपर्यंत सर्वत्र नियमानुसार तपासणी सुरू असल्याचे मुंढे यांनी सांगितले.

तुकाराम मुंढे बालगंधर्व रंगमंदिरात पुणे लोकल आणि माय जनसेवक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भविष्यवेध - संवाद भविष्याचा या उपक्रमांतर्गत अनस्टॉपेबल तुकाराम या विशेष मुलाखत कार्यक्रमात बोलत होते. प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप आणि वरिष्ठ पत्रकार प्रशांत आहेर यांनी त्यांची मुलाखत घेतली.




यावेळी त्यांनी बालपणापासूनचा प्रवास, यूपीएससीतील यश-अपयश, प्रशासकीय कारकिर्दीतील कठोर निर्णय आणि अन्न सुरक्षेशी संबंधित धोरणांवर मनमोकळे भाष्य केले.

यावेळी तरुणाईला मार्गदर्शन करताना मुंढे म्हणाले की, प्रत्येक तरुणाने स्वतःची स्वप्ने आणि सद्विवेकबुद्धीचे पालन केले पाहिजे. केवळ प्रवाहाबरोबर न वाहता समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करावा. फक्त यशाकडे न पाहता अपयशातूनही शिकण्याचा प्रयत्न करा आणि कोणाचेही अंधानुकरण न करता स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. डिजिटल युगात तरुणांचा अटेंशन स्पॅन कमी झाला असून, स्क्रीन टाइम वाढला आहे. त्यामुळे केवळ सोशल मीडियावर रील्स स्क्रोल न करता विचार करा आणि कष्टाची तयारी ठेवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा.

प्रवाहातील लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे वाहून न जाता जिवंत माणसाप्रमाणे ध्येयाकडे वाटचाल करा. परिस्थिती कशीही असली, तरी तुमचे भविष्य हे तुम्ही आज घेतलेल्या निर्णयांवरच अवलंबून असते. तुकाराम मुंढे म्हणाले, वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे मला त्रास होत नाही. उलट बदल हा प्रगतीचा अविभाज्य भाग असून, माझ्या जितक्या जास्त बदल्या होतील, तितके अधिक सकारात्मक बदल घडतील, अशी रोखठोक भूमिका मुंढे यांनी मांडली.

## एकनाथ शिंदेंना फडणवीसांचा त्रास, त्याची तक्रार करायलाच ते मोदींकडे गेले; नाना पटोलेंचा दावा

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- "महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोठा त्रास होत आहे आणि याच त्रासाची तक्रार करण्यासाठी शिंदे हे दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीला गेले होते," असा खळबळजनक दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केला आहे. आज पत्रकार परिषदेत बोलताना पटोले यांनी शेतकरी आत्महत्या, बोगस बियाण्यांचे रॅकेट, जेन झी आंदोलन, राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत वाद आणि भाजपच्या आरक्षण धोरणावर सडकून टीका केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेल्या भेटीवर भाष्य करताना पटोले म्हणाले, "कालच मी कोल्हापूरमध्ये सांगितले होते की, एकनाथ शिंदेंना फडणवीसांचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. महायुतीत कुरघोडीचे राजकारण सुरू आहे आणि फडणवीसांच्या त्रासाची तक्रार घेऊनच शिंदे दिल्लीत मोदींच्या दरबारी गेले होते. पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्या दौऱ्यांमुळे महाराष्ट्राला काही मिळत नाही, उलट महाराष्ट्राच्या शासकीय मालमत्ता आणि प्रकल्प केंद्रातील मित्रांच्या घशात घालण्याचे काम सुरू आहे." राज्यातील कृषी संकटावर संताप व्यक्त करत पटोले म्हणाले, "सध्या शेतीचा हंगाम सुरू असताना राज्यभरात खतांचा आणि बियाण्यांचा प्रचंड तुटवडा आहे. बाजारात बोगस बियाणे आणि बनावट खते सर्रास विकली जात असून शेतकऱ्यांना लुटले जात आहे. अकोल्यातील घटनेवरून स्पष्ट झाले आहे की, सरकारच या बोगस कंपन्यांना पाठीशी घालत आहे. इतकेच काय तर शासकीय महाबीज महामंडळसुद्धा बोगस बियाणे विकत असल्याचे उघड झाले आहे. या भ्रष्ट कारभारामुळे आज देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत."

# ...आणि छोडो भारतचा नारा दिला!

काँग्रेस कार्यकारिणीने निर्णयासाठी पाठवलेल्या १४ जुलै १९४२ च्या ठरावाचा काळजीपूर्वक विचार केला. त्याचसोबत नंतरच्या जागतिक व अंतर्गत घटनांचा, जागतिक युद्धाची परिस्थिती, ब्रिटिश सरकारची विधाने व भारतामधील व बाहेरील अनुकूल व प्रतिकूल टीकाटिप्पणी यांचा अंतर्भाव आहे. त्याचाही गांभीर्याने विचार केला. समिती त्या ठरावास मान्यता व संमती देत आहे आणि समितीचे असेही मत आहे की, त्यानंतरच्या घटनांनी ठरावाला उचित समर्थन मिळते. त्यातून इंग्रजांनी भारतावरील आपले राज्य तातडीने संपुष्टात आणण्याची गरज आहे. हे भारताच्या व जगाच्या दृष्टीने गरजेचे आहे. ते पुढे चालू ठेवणे भारताला अध:पतित व दुबळे करण्यासारखे व भारताला स्वत:च्या संरक्षणासाठी जगातील स्वातंत्र्यासाठीच्या सहभागासाठी असमर्थ करणे आहे.

भारतातील ब्रिटिश सत्तेची समाप्ती हा महत्त्वाचा व तातडीचा प्रश्न आहे, यावर युद्धाचे भवितव्य अवलंबून आहे आणि साम्राज्यवाद, नाझीवाद व फॅसिझमविरुद्धच्या संघर्षातील, स्वातंत्र्याच्या आंदोलनातील सर्व शक्तींचे भवितव्यही अवलंबून आहे. हे केवळ युद्धाच्या भवितव्याशी निगडित नसून सर्व दडपलेली व अंकित मानव जात दोस्त राष्ट्रांच्या संयुक्त आघाडीकडे आकर्षित होईल. त्यामध्ये भारतही असेल आणि या राष्ट्र समूहांना नैतिक व स्फूर्तिजन्य लौकिक असे जगाचे नेतृत्व मिळेल. भारतीय पारतंत्र्य हे ब्रिटिश साम्राज्याचे प्रतीक राहिले तर तो साम्राज्यावरील कलंक आहे. राष्ट्र समूहाच्या भवितव्यावर प्रतिकूल परिणाम करणारा ठरेल.

आजचा हा धोका भारतातील साम्राज्यवादाची समाप्ती व भारतीय स्वातंत्र्याची गरज अधोरेखित करतो. भविष्यातील आश्वासने व विश्वास सांप्रतचे धोके व प्राप्त परिस्थितीमध्ये पुरेसे नाहीत. ते भारतीय जनतेच्या मनावर काहीही परिणाम करू शकणार नाहीत. स्वातंत्र्याची ज्योतच तमाम भारतीय जनतेचा उत्साह व शक्ती निर्माण करू शकेल व ती युद्धाचे स्वरूपच बदलून टाकेल. म्हणून अखिल भारतीय काँग्रेस समिती ब्रिटिश सत्तेने भारतातून निघून जावे म्हणून पुनश्च सर्व ताकदीने मागणी करत आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या घोषणेनंतर एक हंगामी सरकार स्थापन केले जाईल आणि भारत संयुक्त राष्ट्र समूहाच्या स्वातंत्र्याच्या संघर्षामधील सर्व संकटांच्या व सामूहिक कृतीमध्ये सहभागी असेल. हंगामी सरकार देशातील सर्व पक्ष व संघटनांच्या सहकार्याने बनेल. जनतेच्या सर्व विभागांतील प्रतिनिधी असलेले असे ते संयुक्त सरकार असेल. त्याचे प्राथमिक कार्य भारतावरील आक्रमणाचा लष्करी व अहिंसात्मक शक्तीने मुकाबला करून भारताचे संरक्षण करणे हे राहील आणि ते मित्रराष्ट्रांच्या सहकार्याने केले जाईल. भारतातील शेतीमध्ये, कारखान्यांमध्ये व इतरत्र श्रम करणाया जन विभागाच्या प्रगतीसाठी हे सरकार कटिबद्ध राहील. कारण भारताची सत्ता खर्या अर्थाने याच जनतेची आहे. हंगामी सरकार घटना समितीची योजना तयार करेल व जनतेच्या सर्व विभागांना मान्य होईल अशी राज्यघटना ही समिती तयार करेल. ती घटना काँग्रेसच्या मतानुसार संघीय (षी्रत) स्वरूपाची असेल. यामध्ये राज्यांना शक्यतो स्वायत्त अधिकार दिले जातील आणि उर्वरित अधिकार (ीग्हम्बब ज्दैी) राज्यांना दिले जातील. भारत आणि मित्रराष्ट्र समूहातील परस्पर संबंध सर्व स्वतंत्र राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या विचारविनिमयाने निश्चित केले जातील. परस्पर सहकार्य व लाभदायक असे याचे स्वरूप राहील. हे आक्रमणाच्या सामायिक उद्देशासाठी असेल. स्वतंत्र हिंदुस्थान जनतेच्या संघटित इच्छाशक्तीने परकीय आक्रमणाचा परिणामकारक मुकाबला करण्यास समर्थ राहील. भारताचे स्वातंत्र्य इतर आशियाई राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची नांदी आहे. बर्मा, मलाया, इंडोचायना, डच, ईस्ट इंडिया, इराण आणि इराक या राष्ट्रांनासुद्धा स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. त्याचसोबत आज जपानच्या ताब्यातील राष्ट्रे भविष्यामध्ये इतर कोणत्याही वसाहतवादी राष्ट्राच्या अंकित राहता कामा नये.

अखिल भारतीय काँग्रेस महासमिती ब्रिटिश सरकारकडे शेवटच्या क्षणी पुनश्च आवाहन करीत आहे. परंतु समितीला वाटते की, आता यापुढे फक्त कालपर्यंत भारताला साम्राज्यवादापासून मुक्त होण्याची जी आकांक्षा आहे व निश्चयी मागणी आहे तिला रोखणे अशक्य आहे. म्हणून ही समिती दृढ संकल्प करीत आहे की आपल्या स्वातंत्र्यासाठी जनतेचा अहिंसक मार्गाने शक्यतो मोठ्या प्रमाणात लढा उभा करणे क्रमप्राप्त आहे. मागील वीस - पंचवीस वर्षांच्या काळामध्ये शांततापूर्ण लढ्यातून जी अहिंसक ताकद निर्माण झालेली आहे तिचा उपयोग करण्याची वेळ आलेली आहे. हा लढा म. गांधींच्या नेतृत्वाखाली चालेल म्हणून ही समिती गांधीजींना विनंती करते की, त्यांनी लढ्याचे नेतृत्व व मार्गदर्शन करावे. ही समिती भारतीय जनतेला आवाहन करते की, या लढ्यात येणारी संकटे व कष्ट यांना धैर्याने व चिकाटीने तोंड द्यावे, गांधीजींच्या नेतृत्वाखाली एकजुटीने उभे राहावे आणि भारतीय स्वातंत्र्याचे शिस्तबद्ध सैनिक म्हणून त्यांचे आदेश पाळावेत. अहिंसा हा लढ्याचा पाया आहे हे त्यांनी लक्षात ठेवावे, अशी कदाचित वेळ येऊ शकेल की कोणतीही काँग्रेस समिती कार्यरत राहू शकणार नाही. जनतेला कसल्याही प्रकारचे आदेश अथवा सूचना मिळू शकणार नाहीत. जेव्हा अशी वेळ येईल तेव्हा लढ्यातील प्रत्येक स्त्री-पुरुषाने अगोदरच दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्य करावे. स्वातंत्र्यासाठी लढणाया प्रत्येक भारतीयाने स्वत:च मार्गदर्शक बनावे व खडतर मार्गावरून मार्गक्रमण करावे, जो स्वातंत्र्याप्रत पोचणार आहे. काँग्रेस महासमितीने भारताच्या भावी राज्यव्यवस्थेचे स्वरूप विशद केलेले असले तरीही समिती स्पष्टपणे ग्वाही देत आहे की, जनतेच्या लढ्याच्या मार्गाने जात असताना काँग्रेसला सत्तेची आकांक्षा नाही. सत्ता जेव्हा येईल ती जनतेची सत्ता असेल. या ठरावावर गांधीजी व पंडित नेहरू यांची भाषणे फार प्रेरक व स्फूर्तिदायी झाली. या ठरावालाच छोडो भारत म्हणतात आणि ९ ऑगस्टला क्रांतिदिन समजला जातो.

# ९ ऑगस्ट क्रांती दिन : ‘चले जाव’ची हाक आजही का ऐकू येत नाही?

**९ ऑगस्ट** हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नाही. हा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील आत्मसन्मान, त्याग, धैर्य आणि सामूहिक निर्धाराचा दिवस आहे. ९ ऑगस्ट १९४२ रोजी ‘भारत छोडो’ आंदोलनाची ठिणगी पडली आणि ब्रिटिश सत्तेला भारतातून हद्दपार करण्याचा अंतिम निर्णायक लढा सुरू झाला. महात्मा गांधींनी दिलेली ‘करेंगे या मरेंगे’ ही हाक केवळ राजकीय घोषणा नव्हती; ती गुलामगिरीच्या मानसिकतेविरुद्धची बंडाची भाषा होती.




आज स्वातंत्र्याला जवळपास आठ दशके होत आली. ब्रिटिश गेले. सत्ता आपल्या हातात आली. संविधान मिळाले. मतदानाचा अधिकार मिळाला. विकासाच्या असंख्य संधी निर्माण झाल्या. तरीही एक प्रश्न अस्वस्थ करतो. तो म्हणजे १९४२ मध्ये ज्यांनी परकीय सत्तेला ‘चले जाव’ म्हटले, त्यांच्या स्वप्नातील भारत आपण खरोखर घडवला आहे का? हा प्रश्न स्वतःला विचारण्याची गरज ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने आहे. ‘चले जाव’ म्हणजे केवळ ब्रिटिशांना हाकलणे नव्हते!

भारत छोडो आंदोलनाचा अर्थ फक्त ब्रिटिशांनी भारत सोडावा एवढाच मर्यादित नव्हता. तो भारतीय जनतेच्या आत्मसन्मानाचा हुंकार होता. अन्याय, शोषण आणि गुलामगिरीविरुद्ध उभे राहण्याची ती चेतना होती. गांधीजींच्या नेतृत्वाखाली लाखो सामान्य माणसे या आंदोलनात उतरली. विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला, व्यापारी, शिक्षक इत्यादिंनी समाजातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने योगदान दिले. नेत्यांना अटक झाली, आंदोलने दडपली गेली, गोळ्या झाडल्या गेल्या, तुरुंग भरले पण स्वातंत्र्याची आस दडपता आली नाही. कारण क्रांती नेतृत्वाने सुरू केली असली तरी ती जनतेने आपल्या रक्ताने पुढे नेली होती. म्हणूनच ऑगस्ट क्रांतीचा इतिहास केवळ काही मोठ्या नेत्यांच्या नावांपुरता मर्यादित करणे हा त्या इतिहासावर अन्याय ठरेल. हजारो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान त्यामागे आहे.

विदर्भाची क्रांतीची धग ही १९४२ च्या आंदोलनाची ज्वाला विदर्भातही धगधगली. चिमूर, आष्टी, यावली यांसारख्या भागांत जनतेने ब्रिटिश सत्तेला थेट आव्हान दिले. विदर्भाच्या मातीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या भजन-कीर्तनातून राष्ट्रभक्तीची चेतना जागवली. त्यांचे प्रबोधन म्हणजे केवळ अध्यात्म नव्हते, त्यात राष्ट्रनिर्मितीची हाक होती. सामान्य माणसाच्या भाषेतून स्वातंत्र्याचा अर्थ सांगणाऱ्या तुकडोजी महाराजांनी जनतेला जागे केले. त्यांच्या शब्दांतून गावागावांत राष्ट्रभक्तीचा अंगार पेटला. चिमूर-आष्टीच्या आंदोलनाने ब्रिटिश सत्तेला हादरा दिला. अनेकांनी प्राणांची आहुती दिली. या शहीदांचे स्मरण करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. त्यांनी स्वातंत्र्य आपल्या पुढच्या पिढीच्या सुखासाठी मिळवून दिले, स्वतःच्या सुखासाठी नव्हे. आज आपण त्यांच्या त्यागाचे ऋणी आहोत. आजचा प्रश्न अधिक कठीण आहे, आज ब्रिटिश नाहीत. मग आज ‘चले जाव’ कोणाला म्हणायचे? त्याचे उत्तर स्पष्ट आहे. अज्ञानाला चले जाव! जातीय द्वेषाला चले जाव! भ्रष्टाचाराला चले जाव! अंधश्रद्धेला चले जाव! स्त्रीद्वेषाला चले जाव! गरीबी आणि विषमतेला चले जाव! आणि संविधानविरोधी मानसिकतेला चले जाव!

आजचा भारत राजकीयदृष्ट्या स्वतंत्र आहे, पण सामाजिक आणि मानसिक स्वातंत्र्याचा प्रवास अजून पूर्ण झालेला नाही. जात, धर्म, भाषा, प्रदेश यांच्या नावावर समाजात भिंती उभ्या राहतात. सोशल मीडियावर द्वेषाची भाषा वाढते. खोट्या माहितीचा प्रसार होतो. शिक्षण असूनही विवेक हरवतो. विकास होत असतानाच विषमता वाढते. म्हणून आजची क्रांती बंदुकीची नसून विचारांची असायला हवी. लोकशाही वाचवणे हीच आजची क्रांती. स्वातंत्र्यसैनिकांनी परकीय सत्तेविरुद्ध लढा दिला. आज आपली जबाबदारी लोकशाही मजबूत करण्याची आहे. संविधानाने आपल्याला अधिकार दिले पण त्याचबरोबर कर्तव्यांचीही जाणीव करून दिली. मतदान करणे म्हणजे केवळ बोटावर शाई लावून घेणे नव्हे. योग्य प्रश्न विचारणे, सत्तेला जाब विचारणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे, कायद्याचा सन्मान करणे आणि दुर्बलांच्या हक्कासाठी आवाज उठवणे, ही सुद्धा लोकशाहीची कर्तव्ये आहेत. लोकशाहीत नागरिक शांत राहिला तर सत्ता अधिक शक्तिशाली होते; पण जागरूक नागरिक प्रश्न विचारतो तेव्हा लोकशाही अधिक मजबूत होते. म्हणूनच आजच्या पिढीला ऑगस्ट क्रांतीचा इतिहास पाठ करून उपयोग नाही. त्या इतिहासामागची विचारांची आग समजून घेणे आवश्यक आहे.

आजच्या तरुणाईने इतिहासातून काय शिकायचे? १९४२ च्या आंदोलनात तरुणांचा सहभाग मोठा होता. आजची तरुणाई तंत्रज्ञानाच्या युगात जगते. हातात स्मार्टफोन आहे, जग बोटांच्या टोकावर आहे. माहितीचा स्फोट झाला आहे, पण विवेकाचा विकास तितक्याच वेगाने झाला आहे का? हा प्रश्न गंभीर आहे. तरुणांनी सोशल मीडियावर केवळ प्रतिक्रिया देणारे नव्हे, तर विचार करणारे नागरिक बनले पाहिजे. देशभक्ती म्हणजे केवळ घोषणाबाजी नाही. राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहणे महत्त्वाचेच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे देशातील अन्याय पाहून अस्वस्थ होणे. सीमेवर सैनिक देशाचे रक्षण करतो, तर नागरिका

ने लोकशाही, संविधान, सामाजिक सलोखा आणि सार्वजनिक नैतिकतेचे रक्षण केले पाहिजे, हीच खरी देशभक्ती. ९ ऑगस्टला आपण शहीदांना पुष्पहार अर्पण करू. भाषणे होतील. घोषणाबाजी होईल. सोशल मीडियावर संदेश फिरतील. पण दुसऱ्याच दिवशी आपण पुन्हा जुन्याच मानसिकतेत परतलो तर त्या श्रद्धांजलीला अर्थ उरणार नाही. म्हणून शहीदांना अभिवादन शब्दांनी नव्हे, कृतीने! शहीदांनी आपल्याला स्वातंत्र्य दिले, आपल्यावर भारत घडविण्याची जबाबदारी सोपवली. त्यामुळे ऑगस्ट क्रांती दिन हा उत्सव नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.

आपण स्वतःला विचारले पाहिजे, मी समाजासाठी काय करतो? अन्याय दिसल्यावर मी आवाज उठवतो का? जात-धर्माच्या पलीकडे माणूस म्हणून दुसऱ्याला स्वीकारतो का?

संविधानातील मूल्ये माझ्या आचरणात आहेत का? देशभक्ती माझ्या कृतीत आहे का? या प्रश्नांची उत्तरे प्रामाणिक असतील तरच ऑगस्ट क्रांतीची मशाल जिवंत राहील. क्रांती आजही संपलेली नाही! १९४२ची क्रांती ब्रिटिश सत्तेविरुद्ध होती. आजची क्रांती आपल्या आतल्या कमकुवतपणाविरुद्ध आहे. स्वार्थ, द्वेष, असहिष्णुता, भ्रष्टाचार आणि उदासीनता यांच्याविरुद्ध प्रत्येक नागरिकाने उभे राहणे आवश्यक आहे. कारण देश बदलण्यासाठी नेहमी मोठी क्रांती आवश्यक नसते. एका विद्यार्थ्याने प्रामाणिकपणे अभ्यास करणे, एका तरुणाने व्यसनाला नकार देणे, एका नागरिकाने लाच देण्यास नकार देणे, एका व्यक्तीने जातीय द्वेषाला विरोध करणे, एका महिलेला समान सन्मान देणेङ्गहीदेखील राष्ट्रनिर्मितीची क्रांतीच आहे.

९ ऑगस्ट आपल्याला एकच प्रश्न विचारतो. स्वातंत्र्य मिळाले, पण आपण खऱ्या अर्थाने स्वतंत्र झालो का? स्वातंत्र्य मिळविणे कठीण होते पण ते टिकविणे त्याहून कठीण आहे. ब्रिटिश गेले पण अज्ञान राहिले. परकीय सत्ता गेली पण सामाजिक विषमता राहिली.

गुलामगिरी गेली पण मानसिक गुलामगिरीची सावली अजूनही आहे. म्हणूनच आज शहीदांच्या स्मृतीसमोर नतमस्तक होताना एकच संकल्प करू या. भारत केवळ आर्थिकदृष्ट्या महासत्ता नव्हे, तर सामाजिक न्याय, समता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी मूल्यांचा देश बनवू या. म्हणून आज पुन्हा एका नव्या ‘चले जाव’ची गरज आहे. भ्रष्टाचाराला चले जाव! जातीय द्वेषाला चले जाव! अंधश्रद्धेला चले जाव! असहिष्णुतेला चले जाव! अन्यायाला चले जाव!

१९४२ मध्ये स्वातंत्र्यसैनिकांनी ङ्गकरेंगे या मरेंगेङ्ग अशी प्रतिज्ञा केली होती. आज आपल्या पिढीची प्रतिज्ञा असावी ङ्गअन्यायाशी लढू, संविधान जपू, द्वेषाच्या भिंती तोडू, माणुसकीची मशाल पेटवू!ङ्ग ऑगस्ट क्रांती दिन केवळ इतिहास आठवण्याचा दिवस नाही तर तो इतिहास आपल्या वर्तमानात जगण्याचा दिवस आहे. ‘चले जाव’ची हाक ब्रिटिशांसाठी होती, आजची हाक अन्यायासाठी असू द्या! अज्ञान, विषमता, भ्रष्टाचार आणि द्वेषाला ‘चले जाव’ म्हणा आणि संविधानाच्या मार्गाने नवा भारत घडवा!

**- प्रवीण बागडे**, नागपूर

# आदिवासी अस्मितेचा गौरव : शाश्वत विकासाचे खरे शिल्पकार

जगभरातील आदिवासी समाजाच्या अस्तित्वाचा, त्यांच्या सांस्कृतिक अस्मितेचा, पारंपरिक ज्ञानाचा आणि मानवी हक्कांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस ‘जागतिक आदिवासी दिन’ म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने १९९४ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता दिल्यानंतर जगभरात आदिवासी समाजाच्या प्रश्नांबाबत जागरूकता निर्माण करण्याचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात सुरू झाले. हा दिवस केवळ औपचारिक शुभेच्छांचा किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांचा नसून आदिवासी समाजाने मानवजातीला दिलेल्या अमूल्य योगदानाचा सन्मान करण्याचा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचा आणि विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा समान सहभाग सुनिश्चित करण्याचा दिवस आहे. आधुनिक विकासाच्या शर्यतीत अनेकदा दुर्लक्षित राहिलेल्या या समाजाने हजारो वर्षांपासून निसर्गाशी सुसंवाद साधत पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन, सामुदायिक जीवन आणि शाश्वत विकासाची जीवनशैली जपली आहे. त्यामुळे आज हवामान बदल, पर्यावरणीय असंतुलन आणि नैसर्गिक संसाधनांच्या ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजाचा जीवनदृष्टिकोन संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी ठरत आहे.




भारत हा सांस्कृतिक विविधतेचा देश असून या विविधतेमध्ये आदिवासी समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतातील अनुसूचित जमातींची संख्या शेकडोमध्ये असून त्यांच्या भाषा, लोकसंस्कृती, परंपरा, श्रद्धा, सामाजिक व्यवस्था आणि जीवनपद्धती या अत्यंत समृद्ध आहेत. भील, गोंड, संथाल, मुंडा, वारली, कोरकू, कातकरी, महादेव कोळी, कोकणा, माडिया, कोलाम, हलबा, आंध अशा विविध जमाती भारताच्या विविध भागांत वास्तव्यास आहेत. महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे, पालघर, नाशिक, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, अमरावती, यवतमाळ, हिंगोली आणि इतर अनेक जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर राहतो. प्रत्येक जमातीची स्वतंत्र सांस्कृतिक ओळख असली तरी निसर्गप्रेम, सामूहिक जीवन, श्रमप्रतिष्ठा, परस्पर सहकार्य आणि साधेपणा ही त्यांची समान वैशिष्ट्ये आहेत. भारतीय संस्कृतीची खरी समृद्धी ही या विविधतेतच दडलेली आहे.

आदिवासी समाजाचा इतिहास हा संघर्ष, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याचा इतिहास आहे. ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध सर्वप्रथम लढा उभारणाऱ्यांमध्ये अनेक आदिवासी वीरांचा समावेश होता. बिरसा मुंडा यांनी अन्यायाविरुद्ध उलगुलान चळवळ उभारून जल, जंगल आणि जमीन यांच्या संरक्षणासाठी संघर्ष केला. तिलका मांझी, सिद्धू-कान्हू, तंट्या भिल, राणी दुर्गावती, कोमाराम भीम, अल्लुरी सीताराम राजू अशा अनेक वीरांनी स्वातंत्र्यलढ्यात अतुलनीय योगदान दिले. परंतु मुख्य प्रवाहातील इतिहासात त्यांच्या कार्याची अपेक्षित दखल घेतली गेली नाही. आज जागतिक आदिवासी दिन हा त्या विस्मृतीत गेलेल्या इतिहासाचे स्मरण करून देतो आणि आदिवासी स्वातंत्र्यवीरांच्या कार्याचा अभिमानाने गौरव करण्याची संधी उपलब्ध करून देतो.

आदिवासी समाजाचे जीवन हे निसर्गाशी अविभाज्यरीत्या जोडलेले आहे. जंगल, डोंगर, नद्या, झरे, वनस्पती आणि वन्यजीव हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. जंगल त्यांच्या दृष्टीने केवळ उपजीविकेचे साधन नसून ते संस्कृतीचे, श्रद्धेचे आणि अस्तित्वाचे केंद्र आहे. म्हणूनच जंगलाचे संवर्धन, जलस्रोतांचे संरक्षण, जैवविविधतेचा आदर आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर ही जीवनमूल्ये त्यांनी पिढ्यान्पिढ्या जपली आहेत. आज जग हवामान बदलामुळे गंभीर संकटांचा सामना करीत असताना आदिवासी समाजाने जपलेली पर्यावरणपूरक जीवनशैली मानवजातीला नवा मार्ग दाखवित आहे. ‘निसर्गावर विजय’ नव्हे तर ‘निसर्गासोबत सहजीवन’ ही त्यांची जीवनदृष्टी आज अधिक महत्त्वाची ठरली आहे. आदिवासी समाजाकडे पारंपरिक ज्ञानाचा अमूल्य ठेवा आहे. औषधी वनस्पतींची ओळख, लोकऔषधोपचार, जलव्यवस्थापन, नैसर्गिक शेती, बीजसंवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण, हवामानाचा अचूक अंदाज आणि वनसंपत्तीचा संतुलित वापर यामध्ये त्यांचे ज्ञान विलक्षण समृद्ध आहे. अनेक आधुनिक संशोधन संस्थांनी या ज्ञानाचा अभ्यास करून त्याची वैज्ञानिक उपयुक्तता मान्य केली आहे. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण आणि शाश्वत विकासाच्या धोरणांमध्ये आदिवासी ज्ञानाला आज जागतिक स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण ही काळाची गरज बनली आहे.

भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जमातींना सामाजिक न्याय मिळावा यासाठी अनेक घटनात्मक संरक्षणे दिली आहेत. शिक्षण, नोकरी आणि लोकप्रतिनिधित्वामध्ये आरक्षण, अनुसूचित क्षेत्रांसाठी विशेष तरतुदी, पंचायत (अनुसूचित क्षेत्र विस्तार) कायदा, वनहक्क कायदा, आदिवासी उपयोजना, एकलव्य निवासी विद्यालये, आश्रम शाळा, शिष्यवृत्ती योजना आणि विविध आर्थिक विकास कार्यक्रम यांद्वारे शासन आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील आहे. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडथळे आहेत. वनहक्कांचे प्रलंबित दावे, विस्थापन, पायाभूत सुविधांचा अभाव, अपुरे आरोग्य, बेरोजगारी आणि आर्थिक दुर्बलता यांसारख्या समस्या अनेक आदिवासी कुटुंबांना आजही भेडसावत आहेत.

शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन आहे. आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार वाढत असला तरी अनेक दुर्गम भागांमध्ये दर्जेदार शाळा, प्रशिक्षित शिक्षक, मातृभाषेत शिक्षण, डिजिटल सुविधा आणि आर्थिक मदतीचा अभाव जाणवतो. परिणामी अनेक विद्यार्थी शिक्षण अर्धवट सोडतात. आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत प्राथमिक शिक्षण, गुणवत्तापूर्ण निवासी शाळा, डिजिटल शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि उच्च शिक्षणासाठी पुरेशा शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिल्यास त्यांचा सर्वांगीण विकास अधिक प्रभावीपणे साधता येईल. शिक्षणामुळे आत्मविश्वास, नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तनाची नवी ऊर्जा निर्माण होते.

आरोग्याच्या क्षेत्रातही अनेक आव्हाने आहेत. कुपोषण, माता-बालमृत्यू, संसर्गजन्य आजार, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव, आरोग्यसेवेची कमतरता आणि दुर्गम भागांतील वैद्यकीय सुविधा अपुऱ्या असल्यामुळे आदिवासी समाजाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. पोषण कार्यक्रम, मोबाईल आरोग्यसेवा, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण, सुरक्षित मातृत्व, आरोग्यविषयक जनजागृती आणि स्थानिक आरोग्य स्वयंसेवकांचे प्रशिक्षण यांद्वारे या समस्या कमी करता येऊ शकतात. आर्थिक विकासाच्या दृष्टीने आदिवासी समाजामध्ये अमर्याद क्षमता आहे. बांबू, मध, लाख, तेंदूपत्ता, औषधी वनस्पती, वनउत्पादने, सेंद्रिय शेती, हस्तकला, वारली चित्रकला, गोंड कला, ग्रामीण पर्यटन आणि वनाधारित उद्योग यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ शकते. स्थानिक उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे, मूल्यवर्धन उद्योग उभारणे, महिला बचतगटांना प्रोत्साहन, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि डिजिटल विपणनाच्या सुविधा निर्माण केल्यास आदिवासी युवक-युवती आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील. स्वावलंबन आणि स्थानिक संसाधनांवर आधारित विकास हीच खरी आर्थिक प्रगतीची दिशा आहे.

आदिवासी महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शेती, वनउत्पादने संकलन, कुटुंब व्यवस्थापन, हस्तकला, लोकपरंपरा जतन आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. तरीही शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी आणि नेतृत्वाच्या बाबतीत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. स्वयं-सहाय्य गट, कौशल्य प्रशिक्षण, सूक्ष्म उद्योग, आर्थिक साक्षरता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्व विकासाच्या माध्यमातून त्यांचे सक्षमीकरण अधिक प्रभावीपणे करता येऊ शकते.

आदिवासी कला आणि संस्कृती ही भारतीय सांस्कृतिक वारशाची जिवंत परंपरा आहे. वारली चित्रकला, गोंड चित्रशैली, लोकनृत्य, पारंपरिक वाद्ये, लोकगीत, लोककथा, सण-उत्सव आणि लोकभाषा या केवळ सांस्कृतिक अभिव्यक्ती नसून त्या त्यांच्या इतिहासाच्या, जीवनमूल्यांच्या आणि तत्त्वज्ञानाच्या साक्षी आहेत. जागतिकीकरणामुळे अनेक स्थानिक भाषा आणि परंपरा लोप पावत असल्याने त्यांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. सांस्कृतिक संशोधन, संग्रहालये, लोककला महोत्सव, शालेय अभ्यासक्रमात स्थानिक परंपरांचा समावेश आणि नव्या पिढीपर्यंत या वारशाचे हस्तांतरण ही काळाची गरज आहे.

आज संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेमध्ये आदिवासी समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण आणि हवामान बदलाशी जुळवून घेण्याच्या त्यांच्या पारंपरिक पद्धती संपूर्ण जगासाठी मार्गदर्शक ठरत आहेत. म्हणूनच आदिवासी समाजाकडे केवळ विकासाच्या लाभार्थी म्हणून नव्हे, तर विकासाचे भागीदार आणि ज्ञानाचे वाहक म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे.

गेल्या काही दशकांत अनेक आदिवासी युवक-युवती शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान, साहित्य, कला, क्रीडा, उद्योजकता आणि राजकारण या क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. त्यांच्या यशामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असून नव्या पिढीमध्ये आत्मविश्वास निर्माण होत आहे. डिजिटल तंत्रज्ञान, ऑनलाइन शिक्षण, ई-व्यवसाय आणि नवउद्योजकतेच्या माध्यमातून आदिवासी समाज नव्या संधींचा लाभ घेत आहे. मात्र या विकास प्रक्रियेमध्ये त्यांची सांस्कृतिक ओळख, पारंपरिक ज्ञान आणि सामाजिक मूल्ये अबाधित राहिली पाहिजेत.

जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यामागील खरी भावना म्हणजे आदिवासी समाजाला दयेचा विषय न मानता सन्मानाचा विषय मानणे होय. त्यांचे हक्क, त्यांची संस्कृती, त्यांचे ज्ञान आणि त्यांची जीवनपद्धती यांचा आदर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विकासाच्या प्रत्येक धोरणात आदिवासी समाजाचा सक्रिय सहभाग, त्यांच्या भूमीवरील हक्कांचे संरक्षण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करणे ही काळाची गरज आहे.

भारताला समृद्ध, समावेशक आणि विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास हा राष्ट्रीय विकासाचा अविभाज्य भाग मानावा लागेल. जल, जंगल आणि जमीन यांचे संवर्धन, पर्यावरणपूरक जीवनशैली, सामुदायिक मूल्ये, लोकज्ञान आणि सांस्कृतिक विविधता यांचा आदर करणारा विकासच खऱ्या अर्थाने शाश्वत विकास ठरू शकतो. म्हणूनच ९ ऑगस्टचा जागतिक आदिवासी दिन हा केवळ एका समाजाचा गौरव करणारा दिवस नसून मानवता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण आणि सांस्कृतिक समृद्धीचा जागतिक संदेश देणारा दिवस आहे. या दिनानिमित्त आदिवासी समाजाच्या संघर्षाला, कर्तृत्वाला आणि ज्ञानपरंपरेला कृतज्ञ अभिवादन करत त्यांच्या सन्मान, समानता आणि सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने कटिबद्ध होणे, हीच या दिवसाला खरी आदरांजली ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# क्रांती दिनाचे प्रसंग

९ ऑगस्ट,१९४२ हा भारतीय इतिहासातील स्वर्निम दिन होय.या दिनालाच ऑगस्ट क्रांती दिन संबोधतात.१९४२ या ऑगस्ट क्रांती दिनाचे जन्मदाते राष्ट्रपिता महात्मा गांधी होते.२६एप्रिल,१९४२रोजी महात्मा गांधी यांनी इंग्रज सरकारला ठणकावून सांगितले की,‘ इंग्रज सरकार भारताचे रक्षण करण्यास व नागरिकांना सोयी सुविधा पुरविण्यास असमर्थ आहे, म्हणून त्यांनी देश सोडून चालते व्हावे. इंग्रजांची कर्तृत्वहिनता, ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर यांच्या खालावलेल्या स्थिती व त्यांच्या अन्याय व अत्याचारावरून उघडी पडली आहे, इंग्रजांनी भारत सोडणे हे त्यांच्या दृष्टीने उचित ठरेल’ गांधीजीच्या ‘भारत छोडो’ या घोषणेमुळे भारताचे नागरिक, विशेषतः तरुण प्रभावित झाले. भारत छोडो ठराव ८ऑगस्ट,१९४२रोजी पास करण्यात आला, त्यानंतर अवघ्या काही तासात इंग्रज सरकारने भारत स्थानबद्धता कायद्यानुसार भारतीय नेत्यांची धरपकड

सुरू केली.काँग्रेस कमिटीच्या सर्व नेत्यांना अटक करण्यात आली. अरुणाआसफली यानी स्वतःला आंदोलनात झोकून दिले.सकाळ ९ऑगस्ट ,१९४२दिन उगवला. या दिवशी सकाळी गवालीया टँक मैदानावर अरुणा आसफअली यांच्या हस्ते भारतीय तिरंगा ध्वज फडकविण्यात येऊन ध्वजवंदन करण्यात आले.इंग्रज सरकारची धरपकड सुरूच होती. बिहार,उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बंगाल या ठिकाणी प्रचंड प्रमाणात मिरवणुका काढण्यात आल्या.सरकारी कचेऱ्यांवर हमले झाले,तेथील युनियन जॅक उतरवून भारतीय तिरंगा ध्वज फडकविण्यात आले.सर्व भारतीय संघटित झाले. त्यांनी देश स्वातंत्र्यसाठी भूमिगत आंदोलने सुरू केली.भारतीय तरुण राष्ट्रनिष्ठेने पेटून उठले इंग्रज सरकारला सळो की पळो करून सोडले.ऑगस्ट क्रांती दिनाने संपूर्ण देशातील चित्र पालटले.व क्रांतीकारकांची एक मोठी फळी तयार झाली. प्रखर देशभक्ती ,व देश स्वातंत्र्य भावना देशवासियात जागृत झाली तो दिन म्हणजे ९ऑगस्ट,१९४२होय. संपूर्ण

देशवासीयात स्वतंत्र भारताची ज्योत पेटविणार दिन क्रांती दिन या निमित्ताने तत्कालीन स्वातंत्र्य वीरांना मनापासून मनापर्यंत मानवंदना.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# ‘चले जाव’ घोषणांनी ब्रिटीशही थरकापला : ऑगस्ट क्रांती दिन

**आत्मक्लेश** करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. ‘क्रांतीकारी’ याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते. या ऐतिहासिक ‘चले जाव’ आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर ‘वंदे मातरम्’ हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले. यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदायासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे फार मोठे धाडस होते. या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट ॲटली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट ॲटली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले. इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर ॲटली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४७ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय.

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन ‘चले




जाव चळवळ’ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह काँगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती. या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते. त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८ रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना ‘चले जाव’चा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली. तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आन्दोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते. सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.

त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला. ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला. भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो.

भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८३ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

**– प्रविण बागडे**

## ९ ऑगस्ट क्रांती मैदानाचे ऐतिहासिक महत्त्व

९ ऑगस्ट हा ‘ऑगस्ट क्रांती दिन’ म्हणून साजरा केला जातो. मुंबईत असलेल्या ऑगस्ट क्रांती मैदानाचं ऐतिहासिक महत्त्व आहे. येथूनच महात्मा गांधींनी ‘भारत छोडो’ आंदोलनाची हाक देशवासीयांना दिली होती. या मैदानातून सुरू झालेल्या चळवळीमुळं ब्रिटिशांना देशातून आपली सत्ता सोडावी लागली होती.

९ ऑगस्ट हा ‘ऑगस्ट क्रांती दिन’ म्हणून साजरा केला जातो. ८ ऑगस्ट १९४२ महात्मा गांधींनी ‘भारत छोडो’ आंदोलनाची हाक दिली होती. त्यानंतर ९ ऑगस्ट हा दिवस ‘क्रांती दिन’ म्हणून पाळण्यात आला. या आंदोलनाने ब्रिटीश साम्राज्याला हादरा बसला होता. ऑगस्टमध्ये हे आंदोलन सुरू झाल्यानं त्याला ‘ऑगस्ट चळवळ’ किंवा ‘ऑगस्ट क्रांती’ असंही म्हटलं जातं. भारतातील ब्रिटिश शासन संपवण्यासाठी ही चळवळ सुरू करण्यात आली होती.

मुंबईतील ‘गोवालिया टँक’ मैदान : ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या ‘गोवालिया टँक’ येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीचे महाअधिवेशन भरले होते. या अधिवेशनात महात्मा गांधी यांनी ‘छोडो भारत’ आंदोलनाची हाक दिली होती. या आंदोलनातून ब्रिटिशांना भारत सोडून जाण्याचा इशारा देण्यात आला होता. या आंदोलनाची सुरुवात मुंबईतील ‘गोवालीया टँक’ म्हणजे आजच्या ‘ऑगस्ट क्रांती मैदाना’तून झाली. त्यानंतर या आंदोलनाचा भडका संपूर्ण देशभरात पसरला होता. या आंदोलनादरम्यान, महात्मा गांधींनी भारतीयांना ‘करेंगे या मरेंगे’ असा नारा दिला होता. या चळवळीदरम्यान देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी हजारो हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता आहुती दिली. अशा अमर हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहून आजचा दिवस साजरा केला जातो.

सविनय कायदेभंग चळवळ : ८ ऑगस्ट १९४२ रोजी बॉम्बे अधिवेशनाने भारत छोडो आंदोलनाची पायाभरणी केली. भारत छोडो आंदोलन ऑगस्टमध्ये सुरू झाले, म्हणूनच याला ‘ऑगस्ट आंदोलन’ असंही म्हणतात. भारतातील ब्रिटीश राजवट संपवण्यासाठी सुरू केलेली ही सविनय कायदेभंग चळवळ होती. गांधीजींनी आपल्या भाषणात देशाला ‘करो किंवा मरो’ असं आवाहन केलं होतं. ही चळवळ ९ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू झाली. यानंतर इंग्रजांनी सूडबुद्धीनं महात्मा गांधींसह सर्व प्रमुख नेत्यांना अटक केली.

# स्थानिक निधी लेखा पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## सभासदांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा; गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळाही संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – स्थानिक निधी लेखा पगारदार कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्यादित, छत्रपती संभाजीनगरची वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. संस्थेच्या कामकाजाचा आढावा, सभासदांच्या सूचना व विविध प्रश्नांवर चर्चा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रम ाला विशेष रंगत आली.



वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या कामकाजासंदर्भात विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सभासदांनी संस्थेच्या हिताच्या दृष्टीने विविध सूचना मांडण्याबरोबरच काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले.

सभासदांनी मांडलेल्या प्रश्नांवर अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि संचालक मंडळाच्या सदस्यांनी सकारात्मक भूमिका घेत चर्चा केली. उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्याचा तसेच प्रश्नांवर योग्य तोडगा काढण्याचा परिपूर्ण प्रयत्न पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला. संस्थेच्या प्रगतीमध्ये सभासदांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, सभासदांनी मांडलेल्या सूचना व मार्गदर्शनामुळे संस्थेच्या कामकाजात अधिक पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्यास मदत होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. भविष्यातही सभासदांच्या हिताला प्राधान्य देत संस्थेची आर्थिक व प्रशासकीय वाटचाल अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव**

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळाही आयोजित करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव हा इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी उपक्रम असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री.एस. बी. मगर, उपाध्यक्ष श्री.डी.एन. सपकाळ, सचिव श्री. एम. टी.अंभोरे तसेच संचालक मंडळातील श्री. व्ही.बी. मुंडे, श्री. पी.पी. होळकर, श्री. आर.एस. मोरे, श्री. डी. डी. गव्हाड, श्री. एम.पी. बावस्कर, श्री. बी.पी. तिरूके, श्री. जी.जे. लंगोटे, श्रीमती एस.ए. शामगुळे, श्रीमती एस.के. कंधारे आणि श्री. डी. आर. कालिके यांची उपस्थिती होती. तसेच कार्यालयीन सचिव श्री. शिवशंकर बिहाडे यांनीही कार्यक्रमाच्या नियोजनात सहभाग घेतला.

सभासद, विद्यार्थी, पालक आणि संस्थेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सभेच्या निमित्ताने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सभासदांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. त्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभा केवळ औपचारिक न राहता सभासदांच्या प्रश्नांना व सूचनांना व्यासपीठ देणारी ठरली. संस्थेच्या पदाधिकारी, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या नियोजनामुळे वार्षिक सर्वसाधारण सभा व वरिष्ठ सभासदांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# आदिवासी जमातीचे प्रबोधन काळाची गरज

देशाचा मूळ रहिवाशी देशातील आदिवासी आहे. मात्र याच मूळ निवासी असलेल्या आदिवासी जमातीची हेळसांड मोठ्या प्रमाणात होत आहे.त्यांच्या हक्काला बगल देण्याचे काम देशात होत आहे. त्यांचे अस्तित्व नाकारण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यांना असलेले घटनात्मक अधिकार ही डावलल्या जात आहेत. वास्तविक हे आदिवासी या देशात आधीपासून आहेत, तेच देशाचे मूळ रहिवाशी असतांना त्यांचे अस्तित्व नाकारणे,त्यांना दुय्यम वागणूक देणे, त्यांच्या साठी असलेले घटनात्मक हक्क त्यांना न देणे, त्यांच्या मुलांना शैक्षणिक सुविधा नसणे. त्यांचे राहणीमान, त्यांची भौगोलिक स्थिती, त्यांचे वास्तव्य, त्यांना इतरांप्रमाणे अन्न, वस्त्र व निवारा या सोयी उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ अशा किती तरी बाबी आहेत ज्या त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत. त्यांचा शासकीय निधी हा वळवुन इतरत्र योजना साठी वापरणे यामुळे आजही आदिवासी जमात स्वातंत्र्य पूर्व काळात होती तशीच आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ऐंशी वर्ष होत आहेत पण आजही या देशाचा मूळ निवासी स्वातंत्र्य पूर्व काळात होता त्याच स्थितीत आहे.ब्रिटिशांच्या काळात इंग्रज सरकारने १८५४ या वर्षी केलेल्या जंगल कायद्यामुळे आदिवासीना भूमिहीन केले.त्या कायद्यानुसारच आदिवासी जल, जंगल, जमीनपासून वंचित झाले. जगाच्या एकूण आदिवासी संख्येच्या

चोवीस टक्के आदिवासी भारतात आहेत. पण ते आपल्या हक्कापासून दूर आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्य घटनेत या आदिवासीना जल, जंगल, जमीनचे हक्क मिळवून दिलेले आहेत पण याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही.या साठी त्यांना ७०-७५वर्षांपूर्वीचे पुरावे मागणी होत आहे.आदिवासी कडे हे पुरावे नाहीत मुळात त्यांचे शिक्षण कमी किंवा नाहीच म्हटले तरी चालेल मग पुरावे कोठून मिळणार.आदिवासी भागात वास्तव्यास असलेल्या आदिवासीना पाहिजे तशा सुख ,सोयी नाहीत ,पण याकडे लक्ष कोण देते? या आदिवासी च्या बाबत कोणीच आवाज उठवत नाहीत. त्यामूळे या देशाच्या खऱ्या रहिवाशांचे जीवन आजही दुर्लक्षित आहे.या साठी आदिवासींचे सर्वंकष प्रबोधन ही काळाची गरज आहे. तरच जागतिक आदिवासी दिन साजरा केल्याचे समाधान होईल.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

## जागतिक आदिवासी दिन

आदिवासी!आदिवासी!!
देशाचा मूळ निवासी
मात्र उपाशी पोटी
संघर्ष त्याचा जीवनाशी
जल,जंगल,जमिनीचा
हाच असे खरा मालक
पण नावे करण्यासाठी
टाळा-टाळ करतो मालक
आदिवासी साठी जरी असती
लाभदायी योजना अनेक
पण या योजनांचे नसे
कार्यस्वरूप सत्य व नेक
शिक्षण, आरोग्य, निवारा
या सुविधा उपलब्ध जरी
पण मनुष्यबळ अभावी
फक्त दिसती कागदावरी
आदिवासींचे जीवन आजही
सुविधांपासून असे वंचित
का त्यांच्या बाबतीत
विचार असावे संकुचित
देशाच्या मूळ निवासींचा
विचार सर्वंकष करावा
आदिवासींच्या विकासाचा
ध्यास मनी धरावा

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# कोकणवाडीतील ७० हजार चौरस फुटांवरील अनधिकृत धंद्यांना न्यायालयाचा दणका

## परवानगीविना सुरू असलेले ट्रॅव्हल्स पार्किंग, स्टॉल्स व किऑस्क बंद करण्याचे आदेश; मजीदुल्लाह यांचा न्यायालयावर विश्वास

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - शहराच्या मध्यवर्ती भागातील कोकणवाडी परिसरातील सीटीएस क्रमांक २०७१९ मधील सुमारे ७० हजार चौरस फूट मोकळ्या भूखंडावर सुरू असलेल्या अनधिकृत व्यावसायिक घडामोडींना न्यायालयाने चाप लावला आहे. वाहतूक पोलिस तसेच महापालिका किंवा कॅन्टोन्मेंट बोर्डाची आवश्यक परवानगी न घेता सुरू असलेले खासगी ट्रॅव्हल्सचे पार्किंग, स्टॉल्स आणि किऑस्क तत्काळ बंद करण्याचे आदेश सह-दिवाणी न्यायाधीश टी. एच. शेख यांनी दिले आहेत.


या प्रकरणात न्यायालयाने केवळ दोन भावांमधील मालकी हक्काचा वाद न पाहता सार्वजनिक सुरक्षा, वाहतूक व्यवस्था आणि आवश्यक कायदेशीर परवानग्यांचा अभाव या गंभीर बाबींना प्राधान्य दिले. वाहतूक सहायक पोलिस आयुक्तांच्या पत्रानुसार ‘एस. के. पार्किंग’ या नावाने सुरू असलेल्या बस पार्किंगला कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचे समोर आले.

महापालिका अथवा कॅन्टोन्मेंट बोर्डाची परवानगी नसतानाही या जागेवर व्यावसायिक स्वरूपाच्या हालचाली सुरू होत्या. त्यामुळे परिसरात वाहतूक कोंडी निर्माण होण्यासोबतच नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला होता. तसेच संयुक्त मालकीच्या जागेतील इतर सहम ालकांवरही कायदेशीर कारवाईची शक्यता निर्माण झाली होती.

फिर्यादी शेख मजीदुल्लाह यांच्या वतीने ॲड. अमित याडकीकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, संयुक्त मालकीच्या भूखंडावर प्रतिवादी क्रमांक १ शेख खलीलुल्लाह यांच्याकडून दररोज सुमारे ४० बसच्या पार्किंगमधून प्रत्येकी २५० रुपये, पिक-अप वाहनांकडून १५० रुपये, तसेच पाणीपुरवठा आणि स्टॉल्सच्या माध्यमातून दररोज सुमारे २५ हजार रुपयांची कथित कमाई केली जात होती.

**आदेशाच्या अंमलबजावणीकडे लक्ष** – अनधिकृत पार्किंग आणि व्यावसायिक उपक्रम बंद करण्याच्या न्यायालयीन आदेशाची प्रत्यक्ष अंम लबजावणी कशी होते, याकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. आदेशाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास कोकणवाडी परिसरातील वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### ‘न्यायालयावर पूर्ण विश्वास होता’ – शेख मजीदुल्ला बारक्तउल्ला



न्यायालयाच्या आदेशानंतर प्रतिक्रिया देताना शेख म जीदुल्लाह म्हणाले, संयुक्त मालकीच्या जागेचा गैरवापर करून अनधिकृत व्यावसायिक उपक्रम सुरू असल्याने आम्ही न्यायालयात धाव घेतली. न्यायव्यवस्थेवर माझा पूर्ण विश्वास होता आणि न्यायालयाकडून योग्य निर्णय मिळेल, अशी अपेक्षा होती. न्यायालयाने सार्वजनिक हित, कायदेशीर परवानग्या आणि सुरक्षेच्या दृष्टीने घेतलेली भूमिका समाधानकारक आहे. या आदेशामुळे परिसरातील नागरिकांना आणि वाहनधारकांना निश्चितच दिलासा मिळेल.

# दीड लाखाहून अधिक गोविंदांना ७५ रुपयांत १० लाखांचे विमाकवच

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) - दहीहंडी उत्सवासाठी राज्यातील १ लाख ६० हजार गोविंदांना यंदा १० लाखांचे विमा कवच मोफत देण्याचा निर्णय आज राज्य शासनाने घेतला. त्यासाठी प्रत्येकी फक्त ७५ रुपये प्रीमियम राज्य शासनाकडून भरला जाणार आहे. दहीहंडी खेळताना गोविंदाचा मृत्यू झाल्यास १० लाख रुपये या विमा योजनेनुसार मदत मिळणार आहे तसेच जखमी गोविंदांना उपचारासाठी रुग्णालयीन खर्च म्हणून कमाल १ लाख रुपये देण्याची तरतूदही या योजनेमध्ये आहे.

क्रीडा व युवक कल्याण विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय आज जारी केला. गेल्या वर्षी दीडशे गोविंदांना हे कवच देण्यात आले होते. यंदा गोविंदा पथकांची वाढती संख्या विचारात घेऊन त्यात वाढ करण्यात आली. मानवी मनोरा कोसळून गोविंदाचा मृत्यू झाल्यास, दोन्ही डोळे अथवा शरीराचे दोन अवयव निकामी झाल्यास किंवा कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास १० लाख रुपयांचे आर्थिक संरक्षण दिले जाईल. एक हात, एक पाय किंवा एक डोळा गमावल्यास ५ लाख रुपये आणि कायमस्वरूपी अपूर्ण अपंगत्व आल्यास विमा योजनेतील निश्चित टक्केवारीनुसार मदत मिळणार आहे. प्रतिगोविंदा ७५ रुपये किंवा त्यापेक्षा कमी हप्ता आकारणाऱ्या शासकीय विमा कंपनीकडून विमा घेण्याचे निर्देश क्रीडा आयुक्तांना देण्यात आले आहेत. या योजनेसाठी गोविंदांची नोंदणी करण्याची जबाबदारी अंधेरी येथील ‘महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन’ या संस्थेकडे देण्यात आली आहे. पात्र गोविंदांची यादी या संस्थेकडून क्रीडा आयुक्तांकडे दिली जाईल.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# जायकवाडीतील उपलब्ध पाण्याचे सुयोग्य नियोजन करा-पालकमंत्री संजय शिरसाठ

## नाथसागर जलाशयाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते जलपूजन





छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- नाशिक व अहिल्यानगर परिसरात झालेल्या पावसामुळे जायकवाडी धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली असून मराठवाड्यावरील संभाव्य जलसंकट टळले आहे. तथापि, धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने वापर करावा. कृषी सिंचन, उद्योग तसेच पिण्याच्या पाण्याची भविष्यात टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी जलसंपदा विभागाने जलवापराचे सुयोग्य नियोजन करावे, अशा सूचना पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी आज पैठण येथे दिल्या.

जायकवाडी धरण १०० टक्के भरल्यानिमित्त नाथसागर जलाशयाचे पालकमंत्री शिरसाठ यांच्या हस्ते आज जलपूजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार विलास भुमरे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी महापौर समीर राजूरकर, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, नगरसेवक हर्षदा शिरसाट, अधीक्षक अभियंता राजेंद्र धोडपकर, कार्यकारी अभियंता गणेश हासे, उपअभियंता श्रद्धा निंबाळकर, तहसीलदार ज्योती पवार, गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे,आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. शिरसाट म्हणाले की, जायकवाडी धरण हे मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून शेती, उद्योग आणि नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची मोठी गरज या प्रकल्पातून भागविली जाते. यंदा धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने समाधानाची बाब असली, तरी उपलब्ध पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने करणे आवश्यक आहे. पाण्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास आगामी काळात सिंचनासह औद्योगिक आणि पिण्याच्या पाण्याची गरज प्रभावीपणे पूर्ण करता येईल. त्यादृष्टीने संबंधित यंत्रणांनी आतापासूनच नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

आमदार विलास भुमरे म्हणाले की, मराठवाड्याची जीवनदायिनी असलेल्या नाथसागरात यंदा मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जलाशयातील हा पाणीसाठा केवळ पाणी नसून शेती, उद्योग, पिण्याचे पाणी आणि मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी नवी आशा आहे. निसर्गाने दिलेल्या या अमूल्य जलसंपत्तीचे जतन आणि योग्य वापर करणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

यावेळी पालकमंत्री यांच्या हस्ते विधिवत नाथसागर जलाशयाचे जलपूजन करण्यात आले. गोदावरी नदीची साडी-चोळीने ओटी भरून श्रीफळ अर्पण करण्यात आले. जायकवाडी प्रकल्पाच्या नियंत्रण कक्ष परिसरात आयोजित या कार्यक्रमात निसर्गाने दिलेल्या जलसंपत्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

जायकवाडी धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने मराठवाड्यातील कृषी सिंचन, पिण्याचे पाणी आणि औद्योगिक पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने दिलासादायक परिस्थिती निर्माण झाली असून नाथसागर परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

# नो नेटवर्क भागातील नागरिकांना नवीन पाणी योजनेतून नळ कनेक्शन देण्यासाठी मिसारवाडी येथे विशेष कॅम्प

## मालमत्ता कर भरणा करून नळ कनेक्शन घेण्याचे मनपा आयुक्त अमोल येडगे यांचे आवाहन



छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- नवीन पाणीपुरवठा योजनेतून शहरातील 'नो नेटवर्क एरिया'मध्ये नळ कनेक्शन उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मिसारवाडी येथे नागरिकांच्या सोयीसाठी शुक्रवारी विशेष कॅम्प सुरू करण्यात आला आहे.

महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून 'नो नेटवर्क एरिया'मधील नागरिकांना नवीन पाणीपुरवठा योजनेचा लाभ मिळावा, यासाठी संबंधित भागात जनजागृती तसेच नळ कनेक्शनसाठी आवश्यक कागदपत्रे, प्रक्रिया आणि मालमत्ता कराबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून मिसारवाडी येथे शुक्रवारी हा कॅम्प सुरू करण्यात आला आहे.

आयुक्त अमोल येडगे यांनी काल मिसारवाडी येथील कॅम्पला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'नो नेटवर्क एरिया'मधील प्रत्येक नागरिकापर्यंत माहिती पोहोचवून नळ कनेक्शन घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे निर्देश दिले.

ज्या मालमत्ता महापालिकेच्या मालमत्ता कराच्या जाळ्यात आहेत, त्यांनी थकीत मालमत्ता कराचा भरणा केल्यानंतर नळ कनेक्शन घेता येणार आहे. तसेच ज्या मालमत्तांवर अद्याप मालमत्ता कर आकारण्यात आलेला नाही, अशा मालमत्तांचे कर निर्धारण करून संबंधित कराचा भरणा घेतल्यानंतर त्यांना नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

कॅम्पच्या पहिल्याच दिवशी १६ मालमत्ताधारकांनी आवश्यक कागदपत्रे सादर केली असून, त्यांच्या मालमत्तांवर कर आकारणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच मालमत्ता कर आकारण्यात आलेल्या ३० मालमत्ताधारकांना थकीत कराचा भरणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कराचा भरणा केल्यानंतर संबंधित मालमत्तांना नवीन पाणी योजनेतून नळ कनेक्शन देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

मिसारवाडी येथील हा विशेष कॅम्प पुढील दोन दिवस ( शनिवार आणि रविवार) सुरू राहणार असून, परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी कॅम्पचा लाभ घेऊन आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे आणि नवीन पाणी योजनेतून नळ कनेक्शन घेण्यासाठी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे.

# वेरूळ येथे आज चातुर्मास मंगल कलश स्थापना सोहळा

## निर्यापक मुनिश्री १०८ नियमसागरजी महाराज व मुनिश्री १०८ सुपार्श्वसागरजी महाराज यांचे पावन सान्निध्य



छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- "वेरूळ येथे चातुर्मास मंगल कलश स्थापना सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. परमपूज्य निर्यापक मुनिश्री १०८ नियमसागरजी महाराज व मुनिश्री १०८ सुपार्श्वसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात हा मंगल सोहळा रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या धार्मिक सोहळ्यासाठी सकल दिगंबर जैन समाजातील श्रद्धाळू भाविकांना सपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गुरुचरणांच्या सान्निध्यात चातुर्मासाच्या पवित्र पर्वाची सुरुवात होत असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांसाठी वात्सल्य भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्म लाभ घ्यावा तसेच गुरुवर्यांच्या मंगल आशीर्वादाने जीवन धन्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल, एलोरा तसेच सकल दिगंबर जैन समाज, एलोरा-वेरूळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. "आपली पावन उपस्थिती हीच या मंगल सोहळ्याची शोभा आहे. धर्मलाभ अवश्य घ्यावा," असे आवाहन संस्था मार्गदर्शक वर्धमान पांडे अध्यक्ष दिनेश गगवाल व महामंत्री डॉ प्रेमचद पाटनी सहसचिव सुमित ठोले, कोषाध्यक्ष गौतम ठोले शालेय समिती अध्यक्ष मदनलाल पांडे माजी मुख्याध्यापक निर्मलकुमार ठोले यांनी केले आहे. अशी माहिती अतुल बांधे पियुष कासलीवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली आहे.

# पैठणमध्ये १२ वा राष्ट्रीय हातमाग दिन उत्साहात साजरा

## पैठणीचे वैभव जपण्यासाठी विणकरांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यावर भर, ४८ लाभार्थ्यांना सोलर लायटिंग युनिटचे वितरण

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- पैठणच्या ऐतिहासिक नगरीत १२ वा राष्ट्रीय हातमाग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पैठणीच्या वैभवशाली परंपरेचे संवर्धन करण्याबरोबरच हातमाग विणकरांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, त्यांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमास पैठण परिसरातील शेकडो महिला व पुरुष विणकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास संत एकनाथ उद्योग समूहाच्या अध्यक्षा वर्षा विलासराव भुमरे, पैठण नगरपरिषदेच्या अध्यक्षा विद्या भूषण कावसानकर, पंचायत समिती पैठणच्या सभापती वैशाली विनोद बोंबले, वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपआयुक्त वसंत घुले, सहायक आयुक्त प्रशांत सदाफुले यांच्यासह राष्ट्रीय पुरस्कार विजेते विणकर, केंद्रीय बुनकर सेवा केंद्र, मुंबईचे प्रतिनिधी, हस्तकला विभागाचे अधिकारी, सिल्क क्षेत्रातील शास्त्रज्ञ श्री. बावस्कर तसेच विणकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त राष्ट्रपतींच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या देशपातळीवरील मुख्य कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण मोठ्या स्क्रीनद्वारे उपस्थित विणकरांना दाखविण्यात आले.

केंद्रीय बुनकर सेवा केंद्राचे आशुतोष जोशी यांनी केंद्र शासनामार्फत हातमाग विणकरांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती दिली. विणकरांनी उपलब्ध योजनांचा लाभ घेऊन पारंपरिक हातमाग व्यवसायाला आधुनिकतेची जोड द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

सहायक आयुक्त, वस्त्रोद्योग प्रशांत सदाफुले यांनी वस्त्रोद्योग विभागामार्फत विणकरांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. योजनांच्या पात्रतेचे निकष, अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे आणि लाभ मिळविण्याची प्रक्रिया याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. प्रत्येक पात्र विणकराने विणकर ओळखपत्र (पहचान कार्ड) काढून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विविध शासकीय योजनांचा लाभ देताना या ओळखपत्राला महत्त्व असल्याने विणकाम करणाऱ्या कारागिरांनी केंद्रीय बुनकर सेवा केंद्राच्या अधिकृत प्रतिनिधींमार्फत आपले ओळखपत्र काढून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

पैठण नगरपरिषदेच्या अध्यक्षा विद्या भूषण कावसानकर यांनी पैठण तालुक्यातील हातमाग व वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी विविध योजना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आमदार विलास भुमरे सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. विणकरांच्या पारंपरिक कौशल्याला प्रोत्साहन देऊन त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

संत एकनाथ उद्योग समूहाच्या अध्यक्षा वर्षा भुमरे यांनी पैठणीच्या वैभवशाली इतिहासाचा आढावा घेत पैठणीने देशासह जगभरात स्वतंत्र ओळख निर्माण केल्याचे सांगितले. पैठणीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी तसेच पैठणी विणकरांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, जागा आणि निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध विभागांचे मंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांशी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.



पैठण परिसरातील विणकरांना नियमित रोजगार मिळावा, त्यांनी तयार केलेल्या पैठणी व अन्य हातमाग वस्त्रांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध व्हावी तसेच तयार उत्पादनांच्या विक्रीसाठी स्वतंत्र आउटलेटची सुविधा निर्माण व्हावी, यासाठी नियोजित प्रकल्पांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत असल्याचेही श्रीमती भुमरे यांनी सांगितले. या उपक्रमांमुळे स्थानिक हातमाग उद्योगाला चालना मिळून रोजगारनिर्मितीस मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**४८ लाभार्थ्यांना सोलर लायटिंग युनिटचे वितरण**

कार्यक्रमात हातमाग विणकरांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत ४८ लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सोलर लायटिंग युनिटचे वितरण करण्यात आले. या सुविधेमुळे विणकरांना हातमागावरील कामासाठी आवश्यक प्रकाश व्यवस्था उपलब्ध होऊन त्यांच्या कामकाजास मदत होणार आहे.

कार्यक्रमास वस्त्रोद्योग, हातमाग, हस्तकला व रेशीम क्षेत्राशी संबंधित अधिकारी-कर्मचारी, तज्ज्ञ आणि विणकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगेश भुकेले व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. वस्त्रोद्योग विभागाच्या प्रणाली हजारी आणि रेणुका कुंजर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

# छत्रपती संभाजीनगरात १४ ते १६ ऑगस्ट देशभरातील कारागीर, उद्योजक आणि हस्तकलेचा भव्य मेळावा; हस्तकला, हातमाग,स्वदेशी उत्पादनाचे सागर रिसॉर्टमध्ये प्रदर्शन

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या ( एमएसएमई) सहकार्याने शिखाज कारागीरी या संस्थेच्या समन्वयात स्वदेश फॅशन व लाईफस्टाईल एक्सपो २०२६ या भव्य हस्तकला मेळाव्याचे आयोजन छत्रपती संभाजीनगरात करण्यात आले आहे.

१४ ते १६ ऑगस्ट २०२६ दरम्यान सागर रिसॉर्ट्स येथे होणाऱ्या या प्रदर्शनात देशभरातील स्वदेशी उत्पादने, हस्तकला, हातमाग, फॅशन आणि लाइफस्टाइल उत्पादनांचे वैविध्य अनुभवण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.

या प्रदर्शनात १०० हून अधिक पुरस्कारप्राप्त कारागीर, एमएसएमई उद्योग, स्टार्टअप्स, महिला उद्योजिका, हातमाग व हस्तकला उत्पादक, 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' उपक्रमातील उद्योजक, सहकारी संस्था तसेच विविध लाइफस्टाइल ब्रँड सहभागी होणार आहेत. ट्रॅक्टर खादी आणि ग्रामोद्योग आयोग, नॅशनल ज्यूट बोर्ड यांसह केंद्र व राज्य शासनाशी संबंधित संस्थांचेही या उपक्रमाला सहकार्य लाभणार आहे.

भारताच्या विविध प्रांतांतील पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक उद्योजकतेचा अनोखा संगम या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. चोखंदळ ग्राहकांना शैलीदार निवडीसाठी हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.त्यामुळे मराठवाड्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कारागिरी म्हणजे केवळ एखादी वस्तू तयार करण्याचे कौशल्य नव्हे; तर पिढ्यान पिढ्या जपलेली कला, परंपरा, कल्पकता आणि स्थानिक ज्ञानाचा अमूल्य वारसा होय. अशा देशातील विविध राज्यातील कुशल कारागिरांनी तयार केलेल्या हस्तकला व हातमाग उत्पादनांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणे, एमएसएमई आणि महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे तसेच भारतीय स्वदेशी उत्पादनांची व्याप्ती वाढविणे, हा या प्रदर्शनामागील महत्त्वाचा उद्देश आहे.

'आत्मनिर्भर भारत', 'व्होकल फॉर लोकल' आणि 'मेक इन इंडिया'च्या संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीची जोड देणारे हे व्यासपीठ ठरणार आहे.त्यामुळे देशभरातील कारागिरांच्या हस्तकलेला,पारंपारिक कारागिरीला चालना देण्यासाठी एकदा सागर रिसॉर्ट्सला भेट देऊन या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे प्रदर्शनामुळे विविध भागांतील प्रतिभावान कारागिरांना आपली उत्पादने आणि कौशल्य मोठ्या ग्राहक वर्गासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगरच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक भूमीवर साकारत असलेला हा स्वदेशीचा भव्य उत्सव कारागिरी, उद्योजकता आणि भारतीय परंपरेचे दर्शन घडविणारा ठरणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील कलाकुसर, नावीन्यपूर्ण उत्पादने आणि उद्योजकतेची नवी ऊर्जा एकाच छताखाली अनुभवता येणार असल्याने नागरिकांसाठी हे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरणार आहे.

# मनपा शाळा एन-सेवन सिडको शाळेतर्फे स्वच्छतेसंदर्भात मानवी साखळी व प्रभातफेरी




छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)-महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत स्वच्छते संदर्भात आणि कचरा विलगीकरण संदर्भात विद्यार्थ्यांची ह्यूमन चैन बनवण्यात आली करण्यात आली. सदरील कार्यक्रम छत्रपतीकार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक मनोज अग्रवाल यांनी भूषवले.

क्लस्टर हेड प्रशांत पाटील सर व प्रभाग इन्चार्ज श्रीमती ललिता घोरपडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे राहुल औटी, रागिणी थोरात, जागृती हिवराळे, प्रवीण लाटे, दत्ता अरदड, श्रुति सुंदरमल, योगेश साळवे या कर्मचाऱ्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षिका सौ.संगीता अंबेकर, श्रीमती सुनीता पाटील, श्रीमती वैशाली सुरडकर, श्रीमती मंगला महाजन, श्रीमती अंजली कुलकर्णी, श्रीमती स्वाती घोडतुरे, श्रीमती दीपाली औटे, श्रीमती शिल्पा बहुरे, श्रीमती वैशाली देशमुख, श्रीमती मंजुश्री राठोड, वेंकट जाधव, श्रीमती शुभांगी चव्हाण, दीपक पडोळ, संदिप कळंबे, सागर मगरे, ज्ञानेश्वर असोलकर, श्रीमती पल्लवी क्षीरसागर, प्रितीश सराटे, सुशील दांडगे, श्रीमती फिरदोस नदाफ, श्रीमती सबासदफ सिद्दीकी, श्रीमती पल्लवी क्षीरसागर, श्रीमती बोरसे, श्रीमती सुनंदा सदावर्ते, श्रीमती अंकिता बोचरे, श्रीमती आश्विनी घोडके, निशांत जडे या सर्व शिक्षक शिक्षिकांनी आणि रमेश देवडे, विजय गायकवाड, अविनाश भोंबे या सेवकांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

# प्रतिबंधित प्लॅस्टिक बाळगणाऱ्यांवर मनपाचा धडक हातोडा: नवकार बेकरीला तब्बल २५ हजारांचा दंड!

## समज देऊनही प्रतिबंधित प्लॅस्टिकचा पुनर्वापर; २५ हजार दंड व साहित्य जप्त



छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने शहरातील प्रतिबंधित प्लॅस्टिक विरोधातील आपली धडक मोहीम अधिक तीव्र केली आहे. शुक्रवारी पथकाने केलेल्या धडक कारवाईत जुना मोढा येथील नवकार बेकरी (रुपेश दोशी) यांच्याकडे पुन्हा एकदा प्रतिबंधित प्लॅस्टिक आढळून आल्याने त्यांना २५ हजार रुपयांचा दणदणीत दंड ठोठावण्यात आला, तसेच प्रतिबंधित प्लॅस्टिकचा संपूर्ण साठा जप्त करून जागीच निकामी करण्यात आला. विशेष म्हणजे, अवघ्या दोन महिन्यांपूर्वी याच बेकरीवर कारवाई करून २५५ किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करण्यात आले होते व २५ हजारांचा दंड आकारण्यात आला होता. तरीही नियमांचे उल्लंघन करत पुन्हा २५ किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक आढळल्याने मनपाने ही कारवाई केली.

**नागरिक मित्र पथकाची सतर्कता**

मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या थेट देखरेखीखाली ही कारवाई पार पडली. शहरात गस्त घालत असताना नागरिक मित्र पथकातील देविदास सुसर व बालाजी साबळे यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे झोन क्र. ०२ मधील जुना मोढा भागात ही धडक कारवाई करण्यात आली.

**व्यापाऱ्यांना मनपाचे आवाहन**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाने शहरातील सर्व लहान-मोठे व्यावसायिक, दुकानदार, फेरीवाले व व्यापाऱ्यांना आवाहन केले आहे की, दंड आणि कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर व साठा त्वरित आणि पूर्णपणे बंद करावा. दुकानांमध्ये किंवा व्यवसायाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे प्रतिबंधित प्लॅस्टिक आढळल्यास मोठी दंडात्मक कारवाई केली जाईल. तसेच नियम मोडण्याची पुनरावृत्ती झाल्यास अधिक कठोर पावले उचलली जातील. त्यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी ग्राहकांना कापडी, कागदी किंवा ज्यूटच्या पिशव्यांसारख्या पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्यास प्रोत्साहित करावे आणि छत्रपती संभाजीनगर शहर स्वच्छ, सुंदर व प्रतिबंधित प्लॅस्टिकमुक्त करण्यासाठी मनपाला पूर्ण सहकार्य करावे.